




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक ११ * नांदेड * सोमवार, दि. १२ जानेवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


## राज्याच्या महावितरण विभागात १०० कोटींचा घोटाळा

### संचालक भावेशकुमार, हितेशभाई, हिरेनकुमार विरोधात गुन्हा

**मुंबई (प्रतिनिधी)** –राज्याच्या महावितरण विभागात १०० कोटींचा घोटाळा झाल्याचे उघड झाले आहे. मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी २.० योजनेच्या माध्यमातून हा घोटाळा झाल्याचे उघड झाले आहे. २०२४ ते २०२६ दरम्यान ओम एस सीजेआर लामाट व्हिया प्रोजेक्ट कंपनीने महावितरणची १०० कोटींची फसवणूक केली. कंपनीच्या संचालकांवर निर्मलनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी कंपनीचे संचालक भावेशकुमार पटेल, हिरेनकुमार कनानी आणि हितेशभाई राविया यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरण तपासासाठी आर्थिक गुन्हे शाखकडे वर्ग होण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेत १०० कोटींचा घोटाळा झाल्याचे उघड झाले आहे. मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत महावितरणाचा गंभीर आर्थिक फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला आहे. तक्रारीनुसार, २०२४ ते जानेवारी २०२६ दरम्यान मे. ओम यश




सी.जे.आर. लामाट विया प्रोजेक्ट्स प्रा. लि. या कंपनीचे संचालक भावेशकुमार अश्विनभाई पटेल, हितेशभाई आणि हिरेनकुमार लावजीभाई कनानी यांनी संगनमताने ९९ कोटी ५० लाख रुपयांची बनावट बँक गॅरंटी तयार केल्याचा आरोप आहे. आरोपींनी स्टेट बँक ऑफ इंडिया, जुनागड शाखा (गुजरात) यांच्या नावाची बनावट बँक गॅरंटी तयार करून त्यावर एसबीआयचा बनावट ई-मेल वापरल्याचे तपासात समोर आले आहे. ही बनावट बँक गॅरंटी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण), मुंबई येथील नवीकरणीय ऊर्जा विभागाकडे सादर करण्यात आली.

महावितरणच्या नवीकरणीय ऊर्जा विभागातील सहाय्यक महाव्यवस्थापक राहुल पन्हाळे यांनी सादर केलेली बँक गॅरंटी खरी असल्याचे भासवून संबंधित कंपनीला काम मिळवून देण्यास मदत केल्याचा आरोप आहे. बँक गॅरंटी बनावट असल्याची माहिती असूनही ती खरी असल्याचे जाणीवपूर्वक दाखवून वैयक्तिक आर्थिक फायद्यासाठी हा प्रकार केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या बनावट बँक गॅरंटीच्या आधारे मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत प्रकल्पासाठी वीज खरेदी करार (पीपीए) प्राप्त करण्यात आला.

परिणामी, महावितरणला संबंधित बँक गॅरंटी इनव्होक करता आली नाही. या प्रकारामुळे महावितरण तसेच शासनाची सुमारे ९९.५० कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी महावितरणचे कर्मचारी यांनी दिलेल्या तक्रारीनंतर निर्मलनगर पोलीस ठाण्यात हितेशभाई राविया, हिरेनकुमार कनानी, राहुल पन्हाळे, भावेशकुमार पटेल यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## फटाक्यांनी इमारतीला आग; मोबाईल टॉवर जळून खाक

**पुणे (प्रतिनिधी)** – राज्यात महापालिका निवडणुकांच्या प्रचाराचा धुरळा उडाला असून, आज सर्वच राजकीय पक्षाच्या प्रमुख नेत्यांच्या जाहीर सभा होत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिकच्या गोदावरी काठावर सभा घेतल्यानंतर पुण्यात रोड शोसाठी दाखल झाले आहेत. दुसरीकडे मुंबईत ठाकरे बंधूंची एकत्र जाहीर सभा होत आहे. त्यामुळे, मुंबईसह महाराष्ट्राचे लक्ष मुंबईकडे लागले असतानाच पुण्यात देवेंद्र फडणवीस यांच्या स्वागतासाठी उडवण्यात आलेल्या फटाक्यांमुळे आगीची घटना घडली. भोसरीत मुख्यमंत्र्यांचा रोड शो सुरु असताना ही आगीची घटना घडली, येथील एका इमारतीवर रोड-शो दरम्यान फटाके वाजवताना आग लागली होती.


पुण्यातील भोसरीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा रोड शो सुरु असताना फटाक्यांमुळे एका इमारतीत आग लागल्याची घटना घडली. त्यानंतर, तात्काळ अग्निशमन दलाच्या गाड्यांनी घटनास्थळी धाव घेतली असून, अग्निशमन दलाच्या जवनांकडून आग आटोक्यात आणण्यात आली.

## बिलोलीचे माजी आ. गंगाधर पटने यांचे निधन; मरणोत्तर देहदान

**नांदेड (प्रतिनिधी)**– अग्रेसर समाज कार्यासह ग्रंथालय चळचळीतील व्यक्तीमत्त्व माजी आमदार गंगाधरराव महाळप्पा पटने यांचे रविवार, दि. ११ जानेवारी रोजी सकाळी निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून शहरातील खासगी रूग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. दरम्यान पटने यांच्या इच्छेनुसार शासकीय रूग्णालयास मरणोत्तर देहदान करण्यात आले.

माजी आमदार गंगाधर पटने यांचा जन्म १४ एप्रिल १९४१ रोजी शेतकरी कुटुंबात बिलोली येथे झाला. पटने हे मूळचे करडखेड ता. देगलूरचे! पण ते वकिली व्यवसाय निमित्त बिलोलीला स्थायिक झाले. रविवारी सकाळी ८.०५ वाजता उपचारादरम्यान नांदेड येथे खासगी रुग्णालयात निधन झाले.

त्यांनी मरणानंतर देहदानाचा संकल्प केला होता. त्यांच्या इच्छेनुसार त्यांचा देह नांदेड येथील शासकीय वैद्यकीय



महाविद्यालयास सुपूर्द करण्यात आला.

पटने यांनी बिलोली शहर व देगलूर विधानसभा मतदारसंघातील विकास कामात मोठे योगदान दिले. १९७८ मध्ये जनता पार्टीकडून आमदार म्हणून ते विजयी झाले. त्यानंतर १९८० ला जनता पार्टी व १९९० ला जनता दलातर्फे विधानसभेची उमेदवारी मिळाली, पण त्यात ते पराभूत झाले. १९८४ मध्ये पदवीधर मतदारसंघातून व १९९२ मध्ये विधानसभेतून विधान परिषदेवर जाण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. अखेर १९९८-२००४ या काळात विधान परिषदेमधून पुन्हा आमदार झाले. गंगाधरराव पटने हे बिलोली नगर परिषदेच्या अध्यक्ष पदाच्या सार्वत्रिक निवडणुकीत १९७४ मध्ये सरळ मतदारांतून नगराध्यक्ष म्हणून निवडून आले. ते १९८१ पर्यंत नगराध्यक्ष राहिले. या काळात बराचसा शासकीय निधी आणून बिलोलीत अनेक विकास कामे केली. पटने यांच्या निधनाबद्दल अनेकांनी शोक व्यक्त केला.

बिलोलीचे भुमिपूत्र, ज्येष्ठ नेते, वाचन संस्कृतीचे नेते माजी आमदार स्व. गंगाधरराव पटने यांचे आज अल्पशा आजाराने निधन झाल्याचे समजले. ही अत्यंत दुःखद घटना असून मनाला चटका लावणारी आहे. त्यांच्या जाण्याने राजकारणातील संयमी, शिस्तप्रिय, वाचनालय चळवळीचा नेता गमावल्याचे माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

## नांदेड शहराच्या विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी करा -खा. तटकरे

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड शहराच्या विविध विकास कामांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन खा. सुनील तटकरे यांनी केले.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांची जुन्या नांदेड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या पाठीमागे चौफाळा नांदेड येथे सकाळी १०:३० वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने जाहीर सभा पार पडली. त्याप्रसंगी खासदार तटकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.

या सभेस विशेष उपस्थिती म्हणून आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर व माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर हे उपस्थित होते. तर माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, माजी आमदार सुभाषराव साबणे, माजी आमदार अविनाशराव घाटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस मोहम्मद खान पठाण, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची ग्रामीण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहर कार्याध्यक्ष माधव पावडे, माजी उपमहापौर सरजितसिंघ गिल, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश उपाध्यक्ष मीनलताई खतगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सचिव प्रा.सुनील नानवटे, लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पवार आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## बडतर्फ 'आयएएस' अधिकारी पूजा खेडकरला नोकराने बांधलं, आई-वडिलांना बेशुद्ध करून घरात दरोडा

**पुणे (प्रतिनिधी)** – आलिशान गाडीवर लाल दिवा लावल्यामुळे आणि खोटी कागदपत्रं सादर करून नोकरी मिळवल्याने चर्चेत आलेल्या बडतर्फ आयएएस अधिकारी पूजा खेडकरबाबत आता धक्कादायक घटना समोर आली आहे.

पूजा खेडकरच्या घरात जबरी चोरी करण्यात आली आहे. खेडकर कुटुंबाच्या घरातील एका नोकराने पूजा खेडकरचे वडील दिलीप खेडकर आणि आई मनोरमा खेडकर यांना बेशुद्ध केलं. तसेच पूजा खेडकर यांना दोरीने बांधून घरात चोरी केली आहे. हा धक्कादायक प्रकार रविवारी मध्यरात्री उशिरा घडला आहे.

एका बडतर्फ पोलीस अधिकाऱ्याच्या घरी अशाप्रकारे जबरी चोरी झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती पुण्यातील चतुःश्रृंगी पोलिसांना देण्यात आली आहे. या प्रकरणी अद्याप गुन्हा दाखल करण्यात आला नाही. आपली मनस्थिती ठीक झाल्यानंतर आपण तक्रार दाखल करू, अशी माहिती पूजा खेडकरने पोलिसांना दिली आहे. घरात चोरी झाल्याची माहिती देणाऱ्या पूजा खेडकर यांनी गुन्हा दाखल न केल्याने विविध तर्क वितर्क लावले जात आहेत.

आयएएस पदावरून बडतर्फ करण्यात आलेल्या डॉक्टर पूजा खेडकरने त्यांच्या पुण्यातील घरी काल रात्री चोरीचा प्रकार घडला आहे. याबाबतची माहिती फोन करून चतुःश्रृंगी पोलीसांना देण्यात आली आहे.

## नायगावात युरिया 'गायब'चा खेळ

## कृत्रिम टंचाई करून शेतकऱ्यांची खुलेआम लूट

### कृषी विभाग झोपेतच

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – नायगाव तालुक्यात रब्बी हंगाम जोरात सुरू असताना युरिया खताचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून नायगाव शहरातील कृषी दुकानदारांनी जाणीवपूर्वक कृत्रिम टंचाई निर्माण केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. हरभरा, गहू, ज्वारी, करडई, सूर्यफूल, भुईमूग आदी रब्बी पिकांसाठी अत्यावश्यक असलेले युरिया खत उपलब्ध नाही असे सांगत शेतकऱ्यांना अक्षरशः वेठीस धरले जात आहे.




खत उपलब्ध नसल्याचे सांगणारे हेच दुकानदार मागच्या दाराने मात्र तीनशे ते चारशे रुपयांपर्यंत अवाच्या सव्वा दराने, तेही पावती न देता युरियाची चोरटी विक्री करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांतून होत आहे. खताची नितांत गरज असल्याने अनेक शेतकरी नाईलाजाने जादा पैसे मोजून खत घेण्यास भाग पडत असून दिवसाढवळ्या नायगाव शहरात शेतकऱ्यांची लूट सुरू आहे.

धक्कादायक बाब म्हणजे नायगाव शहरात व नरसी सह अनेक गावात कृषी दुकानदारांकडे युरियाचा साठा असूनही तो लपवून ठेवून कृत्रिम टंचाई निर्माण केली जात आहे. खत नाही असे सांगत शेतकऱ्यांना परत पाठवायचे आणि योग्य संधी साधून वाढीव दराने खत विकायचे, असा हा काळाबाजार सर्रास सुरू आहे. कृषी विभागाच्या तपास यंत्रणा नेमक्या कुठे आहेत, असा संतप्त सवाल आता शेतकरी उपस्थित करत आहेत.

या प्रकारामुळे नायगाव तालुक्यातील शेतकरी प्रचंड अडचणीत सापडले असून वेळेवर खत न मिळाल्यास पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती आहे. त्यामुळे युरिया खताची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या आणि बेकायदेशीर दराने विक्री करणाऱ्या कृषी दुकानदारांवर तात्काळ छापे टाकून कठोर कारवाई करावी, तसेच शेतकऱ्यांना शासनदरात मुबलक प्रमाणात युरिया खत उपलब्ध करून द्यावे, अशी जोरदार मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. आता तरी कृषी विभाग जागा होणार की शेतकऱ्यांची ही लूट अशीच सुरू राहणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## १० फेब्रुवारीपासून १२ वीची लेखी परीक्षा

**पुणे (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केल्यानुसार, येत्या १० फेब्रुवारीपासून बारावीची लेखी परीक्षा सुरु होणार आहे. ही परीक्षा १८ मार्चपर्यंत चालणार आहे. दरम्यान, या परीक्षेसंदर्भात महत्वाची माहिती समोर आली आहे. विद्यार्थ्यांना उद्यापासून बारावीचे हॉल तिकीट मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून याबाबतची माहिती देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे हॉल तिकीट उद्यापासून उपलब्ध होणार आहे. इयत्ता बारावीच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची हॉल तिकिट ऑनलाईन पद्धतीने मिळणार आहे. संबंधित शाळा व ज्युनिअर कॉलेज यांनी हॉल तिकिटांचे प्रिंट आऊट काढून विद्यार्थ्यांना वितरित करावी, अशा सूचना राज्य मंडळाकडून करण्यात आल्या आहेत.

## शिवाजी पार्कवर पार पडली ठाकरे बंधुंची संयुक्त सभा

**मुंबई (प्रतिनिधी)** – महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा टप्पा सुरू असताना, आज ११ जानेवारी २०२६ रोजी दादरच्या छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) यांच्या युतीची ऐतिहासिक संयुक्त सभा पार पडली.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे हे तब्बल २० वर्षांनंतर एका व्यासपीठावर एकत्र आले. या सभेला हजारोंचा जनसागर उपस्थित होता, ज्यामुळे मुंबईत राजकीय वातावरण अधिक तापले आहे. मतदान १५ जानेवारी रोजी होणार असून, ही सभा युतीच्या ताकदीचे प्रदर्शन मानली जात आहे.


सभा मुख्यत राज ठाकरे यांच्या भावुक आणि आक्रमक भाषणाने गाजली. त्यांनी सत्ताधारी महायुती (भाजप-शिवसेना शिंदे गट) वर सडकून टीका केली. राज ठाकरे म्हणाले, आज मुंबईवर संकट आलं आहे. मतं विकत घेतली जात आहेत. मुंबईला लुटण्याचे आणि तोडण्याचे डाव सुरू आहेत. त्यामुळेच आम्ही दोघे भाऊ एकत्र आलो आहोत. मुंबईसाठी हा लढा आहे.

राज ठाकरे यांनी भावूक होऊन आपल्या जुन्या आठवणी सांगितल्या. ते म्हणाले, या व्यासपीठावर मी लहान असताना बाळासाहेब ठाकरे यांच्यासोबत अनेकदा आलो होतो. शिवसेनेची स्थापना इथेच झाली. तेव्हा माझे आजोबा प्रबोधनकार ठाकरे, वडील श्रीकांत ठाकरे आणि माँ उपस्थित होते. आज या क्षणाला हे सर्व इथे हजर असायला हवे होते. ते वरून पाहत असतील आणि आमचा हा लढा पाहत असतील.

राज ठाकरे यांनी युतीच्या प्रक्रियेबाबतही खुलेपणाने बोलले. ते म्हणाले, २० वर्षांनंतर मी पहिल्यांदा युती करतोय. तिकीट वाटपात अनेकांना संधी मिळाली, अनेकांना नाही. काहीजण नाराज झाले, काहींनी दुसऱ्या पक्षात जाण्याचा विचार केला. आमच्या हातात काही गोष्टी नव्हत्या. ज्यांचे मन दुखावले, त्यांची मी दिलगीरी व्यक्त करतो. सगळे आपलेच आहेत. गेलेले परत येतील. जे आता आहेत, ते कुठे जातील माहीत नाही. आम्ही सर्वांसाठी लढतोय.

सामाजिक संस्था आणि कार्यकर्त्यांचे आभार

त्यांनी मराठी अस्मितेसाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्था आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले. अनेक लोकांनी आवाज उठवला, त्यांचे मी आभार मानतो. दीपक पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे विशेष आभार, असे ते म्हणाले. बऱ्याच गोष्टी मी तुमच्यासाठी घेऊन आलो. जाताना पोट भरून जा, असा भावनिक संदेशही दिला.








## भाजपने घेतली बुद्धिजीवी कार्यकर्त्यांची संवाद बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणुकीतील भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील बुद्धीजीवींची संवाद बैठक घेण्यात आली.

येथील कुसुम सभागृह येथे पार पडलेल्या या बैठकीत खासदार डॉ. अजित गोपछडे, भाजप संघटन मंत्री संजय कौडगे, माजी मंत्री डी. पी. सावंत, महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर, जिल्हाध्यक्ष (दक्षिण) संतुक हंबर्डे, जिल्हाध्यक्ष (उत्तर) ॲड. किशोर देशमुख, संयोजक डॉ. अंकुश देवसरकर, चैतन्यबापू देशमुख, भाऊराव कारखान्याचे चेअरमन नरेंद्र चव्हाण, उद्योजक मारोतराव कवळे, डॉ. सचिन उमरेकर, मनोज भंडारी, संतोष पांडागळे, शीतल खांडील, राज यादव आदींचीही उपस्थिती होती.

या बैठकीत खासदार अशोकराव चव्हाण यांनी विविध क्षेत्रातील



बुद्धीजीवींच्या समस्या आणि शहर विकासाबद्दलच्या संकल्पना समजून घेतल्या यावेळी शहरातील समस्या आणि सद्यस्थिती बाबत काही सवाल उपस्थित करीत त्यावर उपायही सुचविले.

यावेळी बोलताना माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांनी लोक सहभाग व शासनाच्या समन्वयातून नांदेडला अधिक विकसित करू. सराफा बाजार व इतवारा भागात रस्ता रुंदीकरण केल्यामुळे जुन्या नांदेड भागात माझ्या कार्यकाळात वाहतूक कोंडी दूर झाली. नांदेड शहरातील अर्धे व्यावसायिक रस्त्यावर व्यवसाय करतात. त्यामुळे रुंद रस्तेसुद्धा अरुंद वाटतात. त्यावर मार्ग काढू. शहरात अनेक ठिकाणी मॉल्स सुरू झाल्यामुळे शहराच्या आर्थिक विकासात भर पडली आहे. अनेकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. शहरात गुंड, माफिया हे चिंताजनक आहे. बोटे तोडणे, डोके फोडणे हे प्रकार सुरू आहेत. शहरातील गुंडगिरी आगामी काळात मोडून काढणार. नांदेडच्या एमआयडीसीत जागाच शिल्लक नाही. उद्योग कसे वाढतील, उद्योगांना जागा देण्यासाठी मी एमआयडीसी विस्तारीकरणासाठी प्रयत्न सुरू केले. नांदेड ते कुष्णूर पर्यंतच्या ओसाड जमिनीचा मी स्वतः हेलिकॉप्टरमध्ये बसून सर्वे केला. मात्र काही राजकारणी लोकांनी एमआयडीसीला विरोध करून न्यायप्रविष्ट केले, त्यामुळे या भागाचा विकास रखडला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता हा विषय मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेतला आहे, असे सांगितले.

यावेळी हर्षद शहा, डॉ. मनीष देशपांडे, डॉ. संजय कदम, दीपक कोठारी, जयप्रकाश भराडिया, अड. आशीष गोदमगावकर, राजेंद्र हुरणे, रवी कडगे, डॉ. बंग यांनी यावेळी भाषणे केली.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# शिक्षक 'हेवी ड्युटी'वर, विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात


शिक्षक म्हणजे समाजाचा शिल्पकार. भावी पिढी घडवण्याची जबाबदारी ज्यांच्या खांद्यावर असते, त्या शिक्षकांकडून अपेक्षा असते ती केवळ अध्यापनाची, संस्कारांची आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची. मात्र सध्याची वास्तवस्थिती पाहिली, तर शिक्षक हे वर्गात कमी आणि कार्यालयीन, प्रशासकीय व अशैक्षणिक कामांत अधिक अडकलेले दिसतात. परिणामी शिक्षकांच्या अध्यापनावर परिणाम होत असून, थेट विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात जाण्याची भीती निर्माण झाली आहे. आज महापालिका, जिल्हा परिषद आणि अनुदानित शाळांमधील शिक्षकांची नोकरी म्हणजे 'हेवी ड्युटी' बनली आहे. एका शिक्षकाला दिवसातून तीन वेळा हजेरी नोंदवावी लागते, ही बाबच या व्यवस्थेची गंभीरता स्पष्ट करणारी आहे. एकीकडे पारंपरिक हजेरी पत्रक, दुसरीकडे शालेय पोषण आहारासाठी स्वतंत्र हजेरी आणि आता 'व्हीएसके' प्रणालीद्वारे ऑनलाईन हजेरी. याशिवाय यू-डायस प्लस, शालार्थ, निपुण भारत, दीक्षा, मध्यान्ह भोजन योजना, विद्यार्थी उपस्थिती, शिक्षक उपस्थिती अशा असंख्य ॲप्स व पोर्टल्सवर माहिती भरण्यासाठी शिक्षकांचे रोजचे दोन ते तीन तास खर्च होतात. हा वेळ वर्गात विद्यार्थ्यांसोबत घालवायचा की संगणकासमोर डेटा एंट्री करायची, असा प्रश्न शिक्षकांपुढे उभा राहिला आहे. हेही कमी होते की काय म्हणून आता शिक्षकांवर नवनवीन अशैक्षणिक जबाबदाऱ्या टाकल्या जात आहेत. शाळा परिसरात मोकाट कुत्री, डुकरे व इतर जनावरे किती आहेत, त्यांच्या बंदोबस्तासाठी कोणत्या उपाययोजना केल्या, याचा अहवाल देण्याच्या सूचना दिल्या जातात. या कामांचा शिक्षणाशी थेट संबंध नसतानाही शिक्षकांना ते करणे बंधनकारक ठरते. परिणामी शिक्षक हळूहळू 'डाटा एंट्री ऑपरेटर' किंवा 'फिल्ड सर्वेअर' बनत चालल्याची भावना शिक्षक संघटनांकडून व्यक्त होत आहे. याशिवाय शिक्षकांवर येणाऱ्या निवडणूक कामांचा भार वेगळाच. नगरपालिका, महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती अशा निवडणुकांमध्ये मतदान, मतमोजणी, प्रशिक्षण, बंदोबस्त अशी कामे शिक्षकांना करावी लागतात. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांमधून शिक्षक सावरतात न सावरतात, तोच पुढील निवडणुकांची तयारी सुरू होते. यामुळे शैक्षणिक वर्षात अनेक दिवस शाळा असली तरी शिक्षक वर्गाबाहेरच असतात. त्यात पुन्हा राजकीय वरदहस्त असलेले शिक्षक कधीच शाळेत नसतात. ते जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि राजकीय नेत्यांच्या घराभोवती चकरा मारत असलेले दिसतात. त्यांच्याकडून कोणते अध्यापन होते, हा संशोधनाचा विषय आहे तरीही ते फुल्ल पगार घेतात. त्यात पुन्हा प्रामाणिक शिक्षक हे बदलती शिक्षण धोरणे, तंत्रज्ञानाचा वाढता वापर, ऑनलाईन प्रणाली, शासन स्तरावरून सतत येणारे नवे आदेश, विविध अभियान, सप्ताह, पंधरवडे, एकाच वर्षात राबवावे लागणारे शेकडो उपक्रम, त्यांचे अहवाल, फाईल्स, बैठका आणि इतिवृत्ते, या साऱ्यांनी अक्षरशः मेटाकुटीला आले आहेत. पोषण आहाराची माहिती, आरोग्य मोहिमा, आधार व रेशनकार्ड पडताळणी, स्वच्छता अभियान, जनगणना अशा कामांमुळे शिक्षकांच्या मूळ भूमिकेला दुय्यम स्थान मिळत आहे. या सर्वांचा थेट परिणाम शिक्षकांच्या मानसिक आरोग्यावर होत आहे. सततचा ताण, वेळेचा अभाव आणि जबाबदाऱ्यांचा डोंगर यामुळे शिक्षकांचे मानसिक संतुलन ढासळत आहे. जेव्हा शिक्षक तणावग्रस्त असतो, तेव्हा त्याचा अध्यापनावर परिणाम होणारच. अभ्यासक्रम पूर्ण करण्याची घाई, वैयक्तिक लक्ष देण्यास वेळ न मिळणे, विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान न होणे, या साऱ्याचा फटका विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला बसतो. शेवटी याचे दुष्परिणाम समाजाला आणि राष्ट्राला भोगावे लागतात. शिक्षण व्यवस्था मजबूत करायची असेल, तर शिक्षकांना त्यांच्या मूळ कामासाठी मोकळे करणे अत्यावश्यक आहे. प्रशासकीय व अशैक्षणिक कामांसाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करणे, एकाच माहितीची पुनः पुन्हा मागणी थांबवणे, ॲप्स व पोर्टल्सचे एकत्रीकरण करणे आणि शिक्षकांचा वेळ वाचवणे ही काळाची गरज आहे. शिक्षक हा सर्वकाही करणारा कर्मचारी नसून तो शिक्षणाचा कणा आहे, ही जाणीव शासन व शिक्षण विभागाने ठेवली पाहिजे. शेवटी प्रश्न इतकाच आहे की, शिक्षक वर्गात शिकवणार नाही, तर विद्यार्थी घडणार कसे? शिक्षकांवरील कामाचा बोजा कमी केला नाही, तर केवळ शिक्षकच नव्हे, तर संपूर्ण पिढी त्याची किंमत चुकवेल, हे विसरता येणार नाही.

# राजमाता जिजाऊंचा सामाजिक दृष्टीकोन

१२ जानेवारी १५९८ रोजी अत्यंत प्रयत्नवादी स्त्रीत्वाचा जन्म झाला आणि महाराष्ट्रातील परिस्थितीने कुस बदलली. ज्यांच्या कर्तृत्वाने एक नवीन इतिहास लिहिला गेला त्या म्हणजे राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ साहेब. ज्या भारतीय स्वातंत्र्याच्या आद्य जननी आहेत.

राष्ट्रमाता जिजाऊंनी आपल्या संस्काराने आणि दूरदृष्टीने एका सामर्थ्यशाली राज्याची निर्मिती केली. जिजाऊ स्वराज्य उभारणीच्या आधार-स्तंभ होत्या. शहाजी महाराजांची कैद व सुटका, अफजलखानाचे संकट, आग्र्याहून सुटका अशा अनेक प्रसंगात शिवबांना जिजाऊंनी मार्गदर्शन केले.

राष्ट्रमाता जिजाऊंच्या मतानुसार स्त्री ही पुरुषाप्रमाणेच हिम्मतवान, बुद्धिमान, कर्तृत्ववान, पराक्रमी, शूर दूरदृष्टीची असते हे जिजाऊंनी समाजाला दाखवून दिले. स्त्रियांच्या सन्मानाची सुरुवात स्वराज्यात केल्याचे दिसून येते. राष्ट्रमाता जिजाऊंचे माहेर आणि सासर दोन्हीही घरातून त्यांना सामाजिक आणि स्त्री, पुरुष समानतेचा वारसा मिळाला होता. त्यांच्या दोन्हीही घराण्यांनी भेदभाव संकल्पनेवर मात केली आणि समानतेचा पुरस्कार केला होता. राष्ट्रमाता जिजाऊंनी दैववादी व पितृसत्ताक चौकट नाकारली होती. तत्कालीन समाजातील अंधश्रद्धा, स्त्रियांचा होणारा अपमान याविरुद्ध त्यांनी आवाज उठवला. यवनांच्या अत्याचाराने पीडित असलेल्या आया बहिणींच्या दुःखामुळे त्या कधीही शांत बसू शकल्या नाहीत. शिवाजी द ग्रेट या ग्रंथात डॉ. बालकृष्णन म्हणतात one word



word she had the head of a man over the shoulder of a woman म्हणजेच, देहाने स्त्री असलेल्या जिजाऊ मूर्तिमंत पौरुश होत्या. स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार त्यांनी केला. स्त्रियांना केवळ घरकामात न अडकवता प्रशासनात, युद्धनीतीत आणि स्वराज्याच्या कार्यात सक्रिय केले. स्त्रियांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले, त्यांना स्वावलंबी बनवले. त्याचबरोबर त्यांना नेतृत्वाचे धडे दिले. त्यामुळे त्यांच्या काळात स्त्रियांचा आदर आणि सन्मान वाढला. त्यांनी स्त्रियांना दैववादी न राहता प्रयत्नवादी राहण्याचा संदेश दिला. थोडक्यात महिला सक्षमीकरणाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊंनी त्या काळात केली होती. स्त्रियांची, स्त्री स्वातंत्र्य बंदी तोडण्याचे श्रेय राष्ट्रमाता जिजाऊंना जाते.

हजारो वर्षाची गुलामगिरी राष्ट्रमाता जिजाऊने मोडीत काढून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवून दिला होता. मानवाच्या अस्तित्वासाठी कल्याणसाठी संघर्ष व परिवर्तन हा विचार जिजाऊंच्या चरित्रातून स्पष्ट होतो.

जिजाऊंनी सती प्रथेविरुद्ध बंड करून त्या शिवरायांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहिल्या आणि त्यांना स्वराज्याची प्रेरणा दिली. १६६४ रोजी पती शहाजीराजे यांच्या निधनानंतर जिजाऊ सती गेल्या नाहीत तर त्यांनी कर्तव्य श्रेष्ठ मानून स्वराज्य निर्मितीच्या कार्यात स्वतःला झोकून दिले आणि इतर स्त्रियांनाही सती न जाण्याचा उपदेश केला. त्यांनी अनेक स्त्रियांचे जीवन वाचवले आणि त्यांना मुलांबाळासोबत जगण्याची नवी दिशा दिली. राजमाता जिजाऊंनी आपल्या कृतीतून स्त्रियांना कर्तव्यनिष्ठ बुद्धिमान व स्वावलंबी बनण्याचा संदेश दिला यासंदर्भात मराठ्यांच्या इतिहासाचे अभ्यासक डॉ. एस. ए. बाहेकर लिहितात जिजाऊंनी कर्तव्य श्रेष्ठ समजून सती न जाता स्वतःला स्वराज्य निर्मितीच्या कार्यात गुंतवून घेतले याचाच अर्थ त्या बुद्धिनिष्ठ होत्या म्हणूनच त्यांनी विरुद्ध बंड केले.

मध्ययुगीन काळात सर्वत्र जुलूमशाही राजवट हिंदुस्तानात अधिकार पदावर होत्या. त्यात मुघल-शाही, निजामशाही, आदिलशाही या राजवटीनी मराठा जनतेवर मोठ्या प्रमाणात जुलूम, अन्याय, अत्याचार केले होते अशा प्रतिकूल परिस्थितीत राष्ट्रमाता जिजाऊने स्वराज्य निर्मितीची प्रेरणा दिली व जनतेची जुलमी राजवटीतून मुक्तता केली.

लोकांमध्ये असलेले भय, अंधश्रद्धा काढून टाकण्यासाठी जिजाऊंनी शिवरायांना घेऊन पुणे येथे सोन्याचा नांगर घडवून शेत जमीन नांगरली. स्थानिक लोकांना अभय दिले. पुणे बेचिराख झाले होते. आदीलशाच्या मुरार जगदेवाने पुण्यावर गाढवाचा नांगर फिरवला होता, भूमी शापित केली होती, वस्त्या उजाड झाल्या होत्या, देवळे पाडली होती अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राष्ट्रमाता जिजाऊ पुणे वसवले, लोकांना धीर दिला, देवळे बांधली आणि नव्याने पुणे शहराची निर्मिती केली. जिजाऊ प्रयत्नवादी दूरदृष्टीच्या होत्या. त्यांनी परंपरेवर अवलंबून न राहता कर्तृत्व आणि कृतीवर विश्वास ठेवला. अंधश्रद्धा, पंचांग, अशुभ यांना त्यांनी महत्त्व दिले नाही.

राष्ट्रमाता जिजाऊंना शेतकऱ्याबद्दल अत्यंत संवेदनशील होत्या. त्यांनी शेतकऱ्यांच्या कल्याणाचा नेहमी विचार केला. शिवरायांना सोन्याचा नांगराने शेती कसण्यास लावून शेतकऱ्यांना शेतीचे महत्व पटवून दिले. स्वराज्याचा गाडा चालवताना शेतीकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. शेतकऱ्यांना अवजारे, धान्य पुरवणे, धरणे बांधली, शेतकऱ्यांच्या मुला-मुलींचे विवाह अत्यंत कर्तव्यनिष्ठपणे त्यांनी पार पाडले. शेतीला स्वराज्याच्या आणि लोककल्याणाच्या केंद्रस्थानी आणले. त्यामुळे कृषी आधारित समाज व अर्थव्यवस्थेचा पाया रचण्यास मदत झाली. राष्ट्रमाता जिजाऊंनी शेतकऱ्यांच्या उन्नतीतूनच राष्ट्राची प्रगती होते हा विचार समाजात रुजवला.

जिजाऊंनी आपल्या राज्यात कधीही भेदभाव केला नाही. सर्व जाती-धर्मातील लोकांना प्रेम, मायेने वाढवले. त्यामुळेच त्या काळातील प्रत्येक व्यक्तीला मावळा म्हटले जायचे. मावळाई त्या इंद्रायणी खोऱ्यातील प्राचीन काळातील मातृसत्ताक महामातेच्या नावावरून हा शब्द अंमलात आणला असे प्राच्यविद्या पंडित डी. डी. कोसंबी म्हणतात, मावळा शब्द स्त्रीप्रधान संस्कृतीचा आदर करतो तसाच तो भेदभाव बाळगत नाही. जिजाऊंचा लढा अखंड मानव जातीसाठी शोषकाच्या विरोधात शोषितांच्या स्वातंत्र्यासाठी होता. अशा या महान विभूतींना आज जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन कोटी कोटी प्रणाम!

-डॉ. सत्यभामा जाधव
सदस्या
बाल कल्याण समिती, नांदेड
मो. ९४०३७४४७१५

# युगप्रवर्तक माँसाहेब जिजाऊ आणि युगपुरुष स्वामी विवेकानंद



आईच्या कोमल, नाजूक हृदयांत आपल्या बाळाविषयी नितांत वात्सल्य स्रवत असते तर तेच बाळ भविष्यात आपल्या अलौकिक कार्यातून आईच्या प्रेम आणि वात्सल्याचं ऋण कर्तृत्वानं फेडण्याचा निखळ प्रयत्न करत असतं ! असं लोकोत्तर कार्य संपन्न झालं कि मग 'कुळी कन्यापुत्र होती जे सात्विक, तयाचा हरीख वाटे देवा' ह्या संत तुकोबांच्या ओळींना चिरस्थायी अभंगत्व प्राप्त होते आणि मग तुकोबाराय आकाशाएवढे होऊन त्रिकालाबाधित सत्य आपल्या कवेत घेऊन आनंदाचे डोही आनंद तरंगाचे भजन करत राहतात ! हेच अविनाशी चिद्घन तत्व महाराष्ट्राच्या उज्वल इतिहासातील युगप्रवर्तक राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ आणि दैदिप्यमान युगपुरुष स्वामी विवेकानंद या महान माता आणि पुत्र या दोघांना अजरामर करतात. त्या दोघांची सुवर्णाक्षरांनी नोंद घेऊन चक्क भारताचा इतिहास लख्ख उजळून जातो आहे.

सोळाव्या शतकाच्या शेवटच्या दशकांत निजामाचे सरदार राजे लखुजीराव जाधव यांच्या पोटी सिंदखेड राजा (विदर्भ) येथे जन्मलेली वीरकन्या जिजाऊ पुढे अनेक शतकांच्या मार्गदर्शक बनतील असे भाकीत खुद्द त्यांचे वडिलांनीच केले होते. 'मला मुलगी झाली म्हणजे ती केवळ कुणाची सून म्हणून नांदणार नाही, तर भविष्यात ती एक राजकर्ती पत्नी आणि वीरमाता म्हणून आपले नाव उज्वल करेल' असे उद्गार काढून एका बापाने आपल्या लेकीला जणू महान कार्य करण्यास मैदान खुले करून दिले होते. विवाहानंतर जिजाउंना अत्यंत खडतर काळाचा सामना करावा लागला. त्यांचे पती शहाजीराजे भोसले आणि लखुजीराव जाधव यांच्यात प्रचंड वितुष्ट आले आणि काळजावर दगड ठेऊन जिजाउंनी आपले भाऊ, वडील आणि माहेर यांना कायमचे सोडले आणि आपल्या पती सोबत खंबीरपणे थांबल्या. वयाच्या १४ व्या वर्षी पुण्याची जहागिरी सांभाळण्याचे दिव्य कार्य माँसाहेब जिजाउंना करावे लागले. आपल्या दोन मुलांचे संगोपन करतांना त्यांना अनेक अडथळ्यांची शर्यत पूर्ण करावी लागली. त्यांचे दुसरे पुत्ररत्न ज्यांनी पुढे जाऊन महाराष्ट्रात स्वकर्तुत्वाने रयतेचं राज्य उभारलं असे छत्रपती शिवराय यांची सर्वांगीण जडणघडण करून एक आदर्श राज्यकर्ती माता म्हणून त्या श्रेष्ठ मार्गदर्शक ठरल्या आहेत.

एकोणिसाव्या शतकाच्या सत्तरीत जन्मलेले आणि आपल्या अलौकिक बुद्धिचातुर्य आणि दैदिप्यमान आत्मज्ञानाच्या बळावर आणि लखलखत्या ब्रह्मचर्याने संपूर्ण विश्वावर ज्यांनी अधिराज्य गाजवले आणि अजरामर झालेलं ओजस्वी व्यक्तिमत्व म्हणजे स्वामी विवेकानंद ! अगदी लहान वयात आपल्या आईचे संस्कार आणि अत्यंत प्रज्ञावंत श्रीगुरु रामकृष्ण परमहंस यांच्या परिसस्पर्शाने युवा नरेंद्र अंतर्बाह्य बदलून गेला. संपूर्ण भारत वर्षाच्या इतिहामध्ये स्वामी विवेकानंदानी आपल्या अलौकिक ज्ञान आणि विद्वत्प्रचुर वाणीच्या ताकदीने हिंदू धर्माची विवेकवादी चिकित्सा करून खरा ईश्वर आणि खरा धर्म जगासमोर आणला. स्वामीजींच्या जीवनातील सर्वोत्कृष्ट प्रसंग म्हणजे त्यांचे १९८३ या वर्षीच्या अमेरिकेत संपन्न झालेल्या विश्व धर्म परिषदेतील हिंदूधर्म दर्शन आणि भारताचे याकरिता केलेले प्रतिनिधित्व! त्या धर्म परिषदेतील 'माझ्या बंधू आणि भगिनींनो !' उच्चारलेले हे शब्द सर्वांना निस्तब्ध करून गेले. आपला भारत देश कसा 'वसुधैव कुटुंबकम' किंवा 'हे विश्वची माझे घर' अशी विश्वबंधुत्वाची संकल्पना घेऊन चालणारा देश आहे (?) हे संपूर्ण जगासमोर उघड झाले. त्यानंतर स्वामी विवेकानंद यांनी जगभर विविध विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण व्याख्याने देऊन लोकांना विवेकवादी धर्म शिकविण्याचे महान कार्य केले. स्वामीजींनी बौद्ध,ख्रिश्चन, इस्लाम आदि सर्व धर्माच्या विषयी सहिष्णुता व्यक्त करतांना ते महात्मा गौतम बुद्धांना बुद्धदेव म्हणून संबोधतांना दिसतात. जयंतीदिनी राजमाता माँसाहेब जिजाऊ आणि युगपुरुष स्वामी विवेकानंद या दोन महान माता-पुत्रांच्या कर्तृत्वाचे आणि सामर्थ्याचे स्मरण होणे अत्यंत गरजेचे आहे. एकेविसाव्या शतकांत सर्वत्र सुधारणेचे आणि आधुनिकतेचे वारे वाहत असतांना आपले मानदंड आणि इतिहास आपण गाठीशी बांधून ठेवणे अगत्याचे आहे.

आज महाराष्ट्र संक्रमण अवस्थेतून जात आहे. महात्मा बसवेश्वर, जगद्गुरू तुकोबाराय, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतीराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदि महापुरुषांनी इथे माणसाला जातीवादाकडून जातीअंताकडे नेण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली. त्यांनी समकालीन लोकांचा रोष पत्करला आणि त्यातून अंतर्जातीय भोजन, विशेषतः अंतर्जातीय विवाह लावून इथल्या जाती मोडीत काढण्याचे कृतीशील कार्य केले असतांना आज आपण त्यांच्या विचारांना तिलांजली देऊन नेमके विकसित होत आहोत कि मागास? आपला प्रवास सरळ सुरु आहे का उलटा? जग विकासाच्या मार्गावर धर्म-वर्ण सोडून पुढे जात असतांना आपण उलट, नको त्या गोष्टींना कवटाळून अधोगतीकडे तर जात नाहीत ना? तरुण व्यसनांच्या विषारी विळख्यात आहे. तरुणांनो, आपले विचारच आपल्याला घडवत असतात. तेंव्हा युवकांनो चला, उठा आणि आपली ध्येय्यपुर्ती होई पर्यंत थांबू नका! हे विचार आत्मसात करा. दुसरीकडे स्त्री शक्तीने माँसाहेब जिजाऊच्या आदर्शाने सर्वार्थाने सशक्त होऊन समाजातील अन्याय-अत्याचाराविरुद्ध आवाज उठविला पाहिजे. तरुणांनी मोबाईलऐवजी मैदानावर व्यायामाने शरीर बलदंड आणि ग्रंथालयात ज्ञान संपादन करून प्रचंड बुद्धिमतेने नवनिर्माणाचे राष्ट्रकार्यातून महान देशभक्तांच्या स्वप्नातील भारतासाठी स्वामीजींच्या मार्गाने चालावे. चला तर मग, आदर्श माता जिजाऊ आईसाहेब आणि युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या स्वप्नातील समता, सहिष्णूता, बलशाली, मातृपितृसन्मान करणारा आदर्श भारत उभारून त्यांच्या जयंतीदिनी त्यांना वंदन करून नवनिर्माणाचा संकल्प करूयात!

-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ,
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो. ९१५८०६४०६८

# बहुआयामी व्यक्तिमत्त्व : डॉ. जगदीश कुलकर्णी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. जगदीश नरहरराव कुलकर्णी यांचा जन्म नांदेड जिल्ह्याच्या कंधार तालुक्यातील लाडका या छोट्याशा गावी दि. १२ जानेवारी १९७२ रोजी झाला. शिक्षणाबद्दलची ओढ आणि पुस्तकांशी जडलेली नाळ ही त्यांना वारसा हक्कानेच मिळाली. कारण त्यांच्या आई जि. प. शाळेच्या शिक्षिका होत्या. त्यांचे प्राथमिक शिक्षण हे जि. प. प्राथमिक शाळा लाडका येथे झाले. चौथीनंतरचे शिक्षण कंधार तालुक्यातील शिक्षण श्री शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयात झाले.

पुढील शिक्षण पूर्ण करत असताना त्यांना शिक्षणाबरोबरच घरच्या शेतीची जे की, गुरे-ढोरे सांभाळणे, त्यांना वैरण घालणे, शेण काढणे आदी कामे करावी लागत आणि ते कर्तव्य म्हणून ते पार पाडत. इयत्ता दहावी वर्गात त्यांनी शाळेतून प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले. त्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला आणि त्यांना शिक्षणाची अधिक गोडी निर्माण झाली. दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांनी सायन्स कॉलेज, नांदेड येथे इयत्ता अकरावीसाठी प्रवेश घेतला. याच काळात त्यांना वाचनाची आवड असल्यामुळे नरहर कुरूंदकर यांच्या वाचनालयाचे सदस्य बनले. त्यांना येथे ग्रंथपाल प्रमाणपत्र अभ्यासक्रमांविषयी माहिती मिळाली. त्यांनी १९८८ मध्ये महाराष्ट्र शासनाचा ग्रंथपाल प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केला. त्याकाळात त्यांनी स्वामी विवेकानंदांचे त्या ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या सर्व मराठीतील ग्रंथाचे वाचन केले. देशासाठी, समाजातील तरुण पिढीसाठी आपण काहीतरी केले पाहिजे ही भावना त्यांच्या मनात निर्माण झाली. स्वामी वेकानंदांची पत्रे या ग्रंथाच्या वाचनाने त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला. महाविद्यालयीन अभ्यासाबरोबरच व्यायाम, वाचन, कथाकथन, बातमीलेखन इत्यादी उपक्रमात ते सहभागी होत असत. गावाकडून



आलेल्या शेतकरी, मजूर, गरीब व्यक्तींना पंचायत समिती, तहसील कार्यालयातील कामासाठी निःस्वार्थ भावनेने ते मदत करीत असत. एकदा त्यांच्या वर्गमित्राने त्यांना असे सांगितले तुला खूप शेती आहे. त्यामुळे तुला आता नौकरीची गरज नाही. त्यावर जगदीश कुलकर्णी यांनी सांगितले की, ती वाडवडिलांची कमाई आहे, माझी नाही, मला स्वतःचं अस्तित्त्व निर्माण करावयाचे आहे.

वैयक्तिक पात-ळीवर डॉ. कुलकर्णी यांनी चर्चा, परिषदा त्याचबरोबर उदबोधन व उजळणी वर्गास सक्रिय सहभाग नोंदवला. वर्ष २००८ साली पुढे त्यांनी एम. फिल. पूर्ण केले. त्यांना दि. १५ जून २०११ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने पीएच. डी. पदवी बहाल केली. दि. ५ फेब्रुवारी २०१२ रोजी तत्कालीन ग्रंथपाल डॉ. एस. पी. सातारकरांच्या आकस्मिक निधनामुळे ग्रंथपाल पदाचा अतिरिक्त पदभार डॉ. जगदीश कुलकर्णी यांच्याकडे आला. मागील १४ वर्षापासून ते विद्यापीठ ग्रंथपाल/संचालक, ज्ञानस्रोत केंद्र प्रमुख म्हणून काम पाहत आहेत. त्यांना दि. २२ जुलै २०१३ रोजी वयाच्या ४१ व्या वर्षी त्यांना प्रोफेसर समकक्ष वेतनश्रेणी प्राप्त झाली. अशी पदोन्नती प्राप्त करणारे ते महाराष्ट्रातील पहिले ग्रंथपाल आहेत. त्यांनी ग्रंथालय संगणकीकरणानंतर नवनवीन तंत्रज्ञान ग्रंथालयात आणण्याच्या प्रयत्न केला. या अंतर्गत यूजीसी इन्फ्लिबनेटकडे एमओयू साईन केले. त्यातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पा-तळीवरील अनेक जर्नल्सचा ॲक्सेस विद्यार्थी, संशोधक, वाचकांना लाभ झाला. ग्रंथालयाचे संगणकीकरणानंतर प्रबंध डिजिटलायझेशनचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या इन्फ्लिबनेट केंद्राकडे पाठविण्यात आला. त्यातून १७ लाख ५६ हजार रुपये एवढे अनुदान प्राप्त झाले. या अन-ुदानातून या विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच्या सर्व पीएच.डी. प्रबंधाचे स्कॅनिंग करून डिजिटलायझेन करुन शोधगंगा या वेबसाईटवर ठेवण्यात आले आहे. शोधगंगा डेटाबेसमध्ये हे विद्यापीठ भार-तात एकोनिसावे तर महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकावर आहे. या विद्यापीठात सादर होणारे पीएच. डी. चे प्रस्ताव शोधगंगोत्री या संकेत स्थळा-वर ठेवले जातात. या विद्यापीठात सर्वात जास्त संशोधन आराखडे शोधगंगोत्रीवर असून, पूर्ण भारतात हे विद्यापीठ पहिल्या क्रमांकावर आहे.

मराठवाड्याच्या शैक्षणिक व सामाजिक चळवळीत डॉ. जगदीश कुलकर्णी यांचे नाव आदराने घेतले जाते. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे डॉ. जगदीश कुलकर्णी हे ज्ञानाच्या उपासनेचे एक चालते-बोलते विद्यापीठ आहेत. त्यांच्या नावावर १६ पुस्तके असून त्यामध्ये ग्रंथालयीन तालिकीकरण, तात्विक व प्रात्यक्षिक आणि ग्रंथालय व्यवस्थापन यांसारख्या प्रमाणभूत ग्रंथाचा समावेश आहे. मुंबई येथील उत्कृष्ट ग्रंथपाल सेवा पुरस्कार, डॉ. बी. आर. थोरात उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार, रुला तामिळनाडूचा उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार अशा विविध पुरस्काराने त्यांना सन्मानीत करण्यात आले. ग्रंथ हे गुरू 'असे मानण-ारे आणि ज्ञान स्त्रोत केंद्राच्या माध्यमातून ज्ञानाची गंगा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणाऱ्या, बहुआयामी व्यक्तिमत्वास ५४ व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा.

-प्रा. डॉ. विकास यशवंता कांबळे
रा. हाळदा, ता. कंधार, जि. नांदेड
मो. ९०९६८०१४३४

# संत परंपरेचा वारसा चालवणारे सेवाभावी शिक्षक : सुरेश घोरबांड गुरुजी



शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक व राष्ट्रीय कार्यात सातत्याने सक्रिय सहभाग नोंदविणारे, सेवाभावाला जीवनमूल्य मानणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे सुरेश घोरबांड गुरुजी. संत परंपरेचा वारसा लाभलेल्या आजोबाच्या संस्कारातून आणि शेतकरी कुटुंबाच्या कष्टातून घडलेल्या गुरुजींचा केवळाबाई यांच्या पोटी सन १९७० साली जन्म झाला.

कंधार येथील श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटीमध्ये माध्यमिक शिक्षक म्हणून त्यांना नोकरी मिळाली.त्यानंतर सोनखेड, कुरुळा, छत्रपती संभाजीनगर येथे सेवा बजा-वून सध्या हळदा येथे शिक्षक म्हणून कार्यरत असताना विविध शैक्षणिक उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत मोलाची भूमिका बजावत आहेत. आई केवळाबाई, वडील सुधाकरराव पाटील कष्टाळू व धार्मिकवृत्तीचे शेतकरी. नोकरी लागण्यापूर्वी गुरुजींनी शेतीबरोबरच ऑटो चालून कुटुंबाला हातभार लावला. हा कष्टाचा वारसा गुरुजीच्या व्यक्तिमत्वात आजही स्पष्ट दिसतो. समाजाच्या सुख-दुःखात सहभागी होणे, गरजूंना मदतीचा हात देणे, ही त्यांची सहजवृत्ती आहे. कुटुंबातूनच लाभलेला धार्मिक व सामाजिक कार्याचा वारसा त्यांनी कृतीतून पुढे नेला आहे. प्रभावी भाषणकला आणि सुंदर हस्ताक्षर ही त्यांची विशेष ओळख.

गुरुजींनी त्यांच्या जन्म गावी श्री संत निवृत्तीनाथ महाराज व श्री संत मोतीराम महाराज यांची मंदिरे उभारली. दरवर्षी मोठ्या उत्साहात वर्धापन दिन साजरा होतो, दर पंधरवड्याला एकादशीनिमित्त महाप्रसादाचे आयोजन केले जाते. आपला वेळ, श्रम आणि संसाधने या सेवा कार्यासाठी अर्पण करणे हीच त्यांची साधना आहे.

आजच्या वाढदिवशी प्रथम संत निवृत्तीनाथ महाराज व संत मोतीराम महाराज यांच्या चरणी दर्शन घेऊन कलंबर विभागातील जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होण्याचा त्यांचा संकल्प आहे. गरजू व गरीब विद्यार्थ्यांना पुस्तके व शैक्षणिक साहित्य देणे, हा त्यांचा सातत्याचा उपक्रम आहे. तसेच राष्ट्रमाता जिजाऊ वधू-वर मंडळाच्या माध्यमातून असंख्य विवाह जुळून सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण त्यांनी घालून दिले आहे. परिवर्तनवादी विचारसरणीच्या मराठा सेवा संघाचे लोहा तालुकाध्यक्ष म्हणून अनेक वर्ष त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. दोन मुलाचा सुंदर संसार असताना आयुष्यात आलेल्या कठीण प्रसंगांनाही त्यांनी धैर्याने सामोरे जाऊन आज पुन्हा यशस्वी वाटचाल सुरू ठेवली आहे. छप्पनाव्या वाढदिवसानिमित्त त्यांचा हा संकल्प पूर्ण होवो, त्यांना दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य त्यांना अखंड सेवासंधी लाभो, हीच मनःपूर्वक शुभेच्छा..!

-पंडित पवळे,
नांदेड
मो. ९८ ९० २३ २९ ६२

## थोडक्यात...

### रासेयो शिबिरात बौद्धिक मार्गदर्शनाला उत्तम प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)–** श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय सिडकोचे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुगट येथे पार पडले. या शिबिराला उत्तम प्रतिसाद मिळाला.

या शिबिरात डॉ. शिवराज देशमुख, डॉ. शंकर विभुते, डॉ. बाबुराव घायाळ, डॉ. हनुमंत भोपाळे, डॉ. केदार सोळुंके यांच्या बौद्धिक मार्गदर्शन झाले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भागवत पस्तापुरे, प्रा. अनिरुद्ध अपस्तंभ यांच्या नेतृत्त्वाखाली पडलेल्या शिबिरात डॉ. केदार सोळुंके यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता व शाश्वत शेती या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

शेतीच्या कामाला एआय कधीही पर्याय होऊ शकत नाही असे ते म्हणाले. डॉ. हनुमंत भोपाळे यांनी व्यक्तिमत्त्व विकासातील मुख्य घटक कोणते आहेत, आणि आपण नेहमीच सकारात्मक कसे राहावे, हे अनेक उदाहरणे देऊन पटवून दिले. डॉ. बाबुराव घायाळ यांनी खेळातून सांघिक भावना कसे निर्माण होते यावर मार्गदर्शन केले. साहित्यिक डॉ. शंकर विभुते यांनी आपल्या ग्रामीण बोलीभाषेतून सादर केलेल्या आमदार गणपतराव या कथेला विद्यार्थ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला. अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. शिवराज देशमुख यांनी वेळेचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सौजन्या शिंदे तर आभार कु. वेदिका शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाचा समारोप प्रार्थनेने झाला.

### स्कुटीसह ८२ हजारांची विदेशी दारू जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने स्कुटीवरून विदेशी दारूचा साठा घेऊन जाणाऱ्यास ग्रामीण पोलीस पथकाने अटकेची कारवाई करून ८२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अवैध दारूची विक्री करणाऱ्यावर गुन्हा दाखल केला

# मुदखेडच्या उपनगराध्यक्षपदी मंगळवारी कोणाची वर्णी लागणार!

## चव्हाण, मच्छीवाले, आऊलवार, चंद्रे यांच्या नावाची चर्चा






**मुदखेड (प्रतिनिधी)** –येथील नगराध्यक्षपदी विश्रांती माधव कदम विराजमान झाले असून, आता उपनगराध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. या पदासाठी शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण, नवनिर्वाचित नगरसेवक इम्रान मच्छीवाले, संजय आऊलवार, श्याम चंद्रे इच्छुक आहेत. लॉटरी कोणाला लागणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्यसभा खासदार तथा भाजपा नेते अशोक चव्हाण, आमदार श्रीजया चव्हाण यांच्या शिक्का– मोर्तबानंतर बंद पॉकेटमध्ये कोणाचे नाव येणार हेच पहावे लागणार आहे.

नगरपरिषद निवडणुकीत २० पैकी भाजपचे १५ नगरसेवक निवडून आले असून, भाजपला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. भाजपा गटनेतेपदी सुनील शेट्टे यांची निवड करण्यात आली आहे. उपनगराध्यक्ष पदाची निवड मंगळवार,
दि. १३ रोजी करण्याचा मुहूर्त ठरला आहे. उपनगराध्यक्ष पदासाठी शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण इच्छुक असून, माजी आमदार अमर राजूरकर यांचे ते विश्वासू म्हणून ओळखले जातात. पक्ष संघटनेची जबाबदारी त्यांच्यावर असून उपनगराध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवून शहर विकासाला प्राधान्य देण्यासाठी पक्षश्रेष्ठी त्यांच्या नावाचा विचार करू शकते. या निवडणुकीत मुस्लीम मतदारांनी भाजप चेहऱ्याला पसंदी दिली असून, गेल्या पंधरा वर्षापासून सातत्याने इम्रान मच्छीवाले नगरसेवक पदाच्या माध्यमातून लोकसेवेचे कार्य करत आहेत. याशिवाय अशोकराव चव्हाण यांचे कट्टर समर्थक म्हणून त्यांची ओळख असून मुस्लीम समाजाला प्रतिनिधित्व देण्याचा विचार झाल्यास इम्रान मच्छीवाले यांना लॉटरी लागू शकते. नवनिर्वाचित नगरसेवक संजय आऊलवार उपनगराध्यक्ष पदाच्या शर्यतीत असून, व्यापारी चेहरा म्हणून समोर आल्यास खा. अशोक चव्हाण यांच्या बंद पॉकीटमधून त्यांचे नाव येऊ शकते. समाजकार्यात अग्रेसर असलेले नवनिर्वाचित नगरसेवक श्याम चंद्रे यांनी पंधरा वर्षाच्या कार्यकाळात स्वतःच्या प्रभागात स्वखर्चातून सार्वजनिक उपक्रम राबवून एक वेगळीच छबी निर्माण केली आहे. गेल्या पंचवार्षिक निवडणुकीतही त्यांची उपनगराध्यक्ष पदाची संधी हुकली होती. खा. अशोक चव्हाण यांचे ते विश्वासू असल्याने त्यांना उपनगराध्यक्ष पदाची संधी मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

नगरपरिषदेत दोन कार्यकर्त्यांची स्वीकृत सदस्यपदी निवड करण्यात येणार आहे. निवडणुकी काळात अनेक कार्यकर्त्यांना स्वीकृत सदस्याचे आश्वासन देण्यात आले होते. दि. १३ जानेवारी रोजी मंगळवारी नगरपरिषद कार्यालय येथे उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्य निवडीकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे बँक कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ : प्र. कुलगुरू डॉ. महाजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** बँक किंवा सहकारी संस्थांनी स्वतः ला सातत्याने अद्ययावत ठेवणे हे विकासाचे लक्षण असून, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाद्वारे सक्षम करणे हा सामाजिक विकासाचा महत्त्वाचा भाग आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित साधनांचा प्रभावी वापर केल्यास बँक कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत निश्चितच वाढ होईल, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि नांदेड येथील गोदावरी अर्बन मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रशिक्षण कार्यकारी विकास कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर सोसायटीचे सेक्रेटरी रवींद्र रक्ते, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, हर्षद शहा, डॉ. शैलेश वाडेर, डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी, ऋषिकेश कोंडेकर, डॉ. रूपाली जैन, डॉ. कृष्णा चैतन्य आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वारातीम विद्यापीठात आधुनिक बँकिंगसाठी साधनांवर कार्यकारी विकास कार्यक्रमांमध्ये आधुनिक बँकिंग व्यावसायिकांसाठी साधने या विषयावर बँकेतील कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ मनोहर चासकर यांच्या पुढाकाराने आणि गोदावरी अर्बन मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी, नांदेड यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश बँकिंग क्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आधुनिक साधनांची ओळख करून देणे व त्यांच्या प्रत्यक्ष उपयोगाबाबत मार्गदर्शन करणे हा आहे. कार्यक्रमात आणि या अत्याधुनिक साधनांची माहिती देण्यात आली.

DeepSeek च्या माध्यमातून डेटा सुर-क्षा, मोठ्या दस्तऐवजांचे विश्लेषण आणि दैनंदिन बँकिंग कामकाज सुलभ करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

NotebookLM द्वारे संशोधन, माहिती संकलन आणि स्रोताधारित निष्कर्ष कसे काढावेत यावर प्रशिक्षण देण्यात आले.

TwinMind प्रणाली-द्वारे केंद्रीकृत ज्ञानसंचय निर्माण करणे, माहितीतील परस्परसंबंध समजून घेणे आणि व्यवस्थापन प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यावर भर देण्यात आला.

या उपक्रमामुळे बँकिंग क्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी यांची डिजिटल कौशल्ये वृद्धिंगत होतील, निर्णयप्रक्रिया अधिक प्रभावी व पारदर्शक बनेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणी कळसकर यांनी केले तर यावेळी उपस्थितांचे आभार डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी यांनी मानले.

या प्रशिक्षण कार्यक्रमाला स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील विद्यार्थी, बँकिंग क्षेत्रातील कर्मचारी आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आदर्श गावातील शेतकऱ्यांचा रस्ता कायमचा केला बंद

**उमरी (प्रतिनिधी)–** तालुक्यातील आदर्श गाव जिरोना येथील गट क्रमांक ५२ मधील गायरान जमीन गावकऱ्यांच्या सहमतीने वन परिक्षेत्र कार्यालय भोकर यांच्याकडे ठराव घेऊन वर्ग करण्यात आली आहे. त्यांनी हद्द कायम करण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालयाकडून शासकीय मोजणी करायला पाहिजे होती. परंतु नियमबाह्य हद्द कायम केली आहे. या प्रकारामुळे या मार्गावरील शेतकऱ्यांचा रस्ता कायमचा बंद झाला आहे.

हद्द कायम करताना शेताच्या सर्वच शेजाऱ्यांना जायमोक्यावर नोटीस तालीम करून हजर राहण्यास ताकीद द्यायला हवी होती. परंतु असे न करता सर्वच शेतकऱ्यांना अंधारात ठेवून शेरेदार केंद्रे व चौकीदार सोळंके, आणि वनमजूर रामचंद्र मामडे यांनी खोदकाम करण्यास सुरुवात केली आहे, ही हद्द कायम केल्याने गावातील शेतकऱ्यांचे गाडीबैल व खत, बियाणे नेण्याचा मार्गच बंद केला आहे.

गावातील शेतकऱ्यांनी केंद्रे शेरेदार व सोळंके चौकीदार वनमजूर यांना आम्हा शेतकऱ्यांना शेताकडे बी, बियाणे, खत, शेतातील, माल घराकडे नेण्यासाठी २० फुटाचा रस्ता देण्याची मागणी केली. परंतु संबंधित या महत्त्वपूर्ण मागणीकडे चक्क दुर्लक्ष करीत आहेत. या प्रकारामुळे या गावातील शेतकरी त्रस्त झाले आहेत.

# लोहा न.प.ची निवडणूक ही ग्रामीण भागातील लोकांनी चळवळ केली -प्रवीण पाटील चिखलीकर

## पेनूर येथे सय्यद बाबा ऊर्सानिमित नवनिर्वाचित नगराध्यक्ष व सर्व नगरसेवकांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार

**लोहा (प्रतिनिधी)** – लोहा न. प. ची निवडणूक ही ग्रामीण भागातील लोकांनी चळवळ केली होती, असे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांनी केले. पेनूर येथे लोहा न.प.चे नवनिर्वाचित नगराध्यक्ष शरद पाटील पवार व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांच्या सत्काराच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

शुक्रवार, दि. ९ जानेवारी रोजी लोहा तालुक्यातील मौजे पेनूर येथे लोहा न. प. चे नवनिर्वाचित नगराध्यक्ष व सर्व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या नगरसेवक व पदाधिकाऱ्यांच्या सत्काराच्या कार्यक्रमांचे आयोजन गावकरी मंडळी पेनूरच्या वतीने करण्यात आले होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष पेनूर येथील ज्येष्ठ नागरिक गोविंदराव पाटील लबडे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, सचिन पाटील चिखलीकर, माजी जिल्हा परिषद सदस्य हंसराज पाटील बोरगावकर, माजी पं. स. सभापती खुशालराव पाटील बुद्रुक, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख मारोती एजगे, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती अण्णाराव पाटील पवार, माजी पं. स. सदस्य माधव चांदणे, दयानंद येवले, माजी सरपंच बाबाराव पाटील गवते, माजी सरपंच गंगाधर पाटील गवते, पेनूरचे विद्यमान उपसरपंच कोंडीबा, गिरीश अप्पा धोंडे, मारोती एजगे यांच्यासह सर्व गावकरी मंडळी उपस्थित होती.

गावकऱ्यांच्या वतीने लोहा न.प. चे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख (मुजावर), गटनेते भास्करराव पाटील पवार, यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सर्व नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते. या सर्वांचे गावकरी मंडळी पेनूरच्या वतीने शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.



यावेळी पुढे बोलताना प्रवीण पाटील चिखलीकर म्हणाले की, गावकऱ्यांच्या वतीने सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला आहे. लोहा न.प.ची निवडणूक ही ऐतिहासिक झाली. ग्रामीण भागातील लोकांनी चळवळ केली व त्यांनी आपले मित्र, नातेवाईकांना भेटून सहकार्य मागितले. आ. चिखलीकर यांनी सर्व उमेदवारांना तन, मन, धन लावून निवडून आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नाला यश मिळाले असल्याचे मान्यवरांनी भाषणातून सांगितले.

# लोह्यात उद्या राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सवानिमित शोभायात्रेचे आयोजन

**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा शहरात जिजामाता शिक्षण संस्थेच्या वतीने गेल्या दहा वर्षांपासून सावित्री ते जिजाऊ जन्मोत्सव साजरा केला जातो. संस्थेचे अध्यक्ष वसंतराव पवार यांच्या संकल्पनेतून राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित दरवर्षी शहरातून शोभायात्रा काढण्यात येते. सोमवार, दि. १२ जानेवारी जुन्या शहरातील शिवछत्रपती विद्यालयाच्या प्रांगणातून सकाळी साडे दहा वाजता शोभा यात्रा निघणार आहे.

जिजामाता शिक्षण संस्थेंतर्गत चालणाऱ्या शिवछत्रपती प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, डॉ. याकुवखॉन उर्दू शाळेच्या वतीने दरवर्षी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित विविध कार्यक्रम घेण्यात येतात. दहा वर्षांपासून सावित्री ते जिजाऊ जन्मोत्सव साजरा होतो आहे.



राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त सोमवार, १२ जानेवारी रोजी शाळेत राष्ट्रमाता जिजाऊ तसेच स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे.

शहरातील मान्यवर, संस्थेचे पदाधिकारी व निमंत्रित यांची उपस्थिती राहणार आहे. ही शोभायात्रा वाजतगाजत लेझीम, ढोल-ताशाचा गजर, जिजाऊ वेशभूषेत विद्यार्थिनी सहभागी होणार असून, ही शोभायात्रा राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या तैलचित्रासह शहराच्या मुख्य रस्त्याने निघेल. मार्केट कमिटी दुसरी कमान बस-स्थानक शिवकल्याण नगर माऊली नगर मार्गे शाळेत विसर्जन होईल.

या शोभायात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक संस्थेचे कोषाध्यक्ष श्रीकांत पवार, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक दामोधर वडजे, मुख्याध्यापक (प्रा.) एच. जी. पवार, उर्दू शाळेचे मुख्याध्यापक सुलतान खान तसेच शिक्षक व कर्मचारी यांनी केले आहे.

# तेली समाज सेवाभावी संस्थेच्यावतीने उप वधू-वर पालक परिचय मेळावा

**नांदेड(प्रतिनिधी)** –तेली समाज सेवाभावी संस्थेच्या वतीने समाजहिताच्या दृष्टीने दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी उप वधू- वर पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा वामनराव पावडे मंगल कार्यालय येथे आयोजित करण्यात येणार असून, समाजातील अविवाहित युवक-युवती व त्यांच्या पालकांसाठी ही एक महत्त्वाची व उपयुक्त संधी ठरणार आहे.

या मेळाव्याचा मुख्य उद्देश तेली समाजातील उप वधू - वर यांना योग्य स्थळ उपलब्ध करून देणे, पालकांमध्ये थेट संवाद साधण्याची संधी निर्माण करणे तसेच विवाह जुळवणी प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व विश्वासार्ह बनवणे हा आहे. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात योग्य स्थळ शोधणे कठीण होत असताना हा उपक्रम समाजासाठी अत्यंत मार्गदर्शक ठरेल, असे आयोजकांनी सांगितले.

मेळाव्यात सहभागी होण्यासाठी नोंदणी करणे अनिवार्य असून, नोंदणीची अंतिम तारीख १५ जानेवारी २०२६ आहे. इच्छुक पालक व युवक-युवतींनी वेळेत नोंदणी करून या मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

ऑनलाईन नोंदणीसाठी वधू-वर नाव नोंदणी फॉर्म लिंक https://forms.gle/3MEVWs9UPVfC8TR37

अधिक माहितीसाठी व नोंदणी संदर्भात संपर्क ९४२-३४४-११८१, ९४२३१-४०९४९, ९०४९६-५५४४४, ९४२१८-५०९६६ या उप वधू-वर पालक परिचय मेळाव्यास समाजातील जास्तीत-जास्त लोकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष बालाजी बनसोडे व संयोजन समितीच्या वतीने करण्यात

# सराईत गुन्हेगार रोहित पुंडगेची रवानगी हर्सुल कारागृहात

**नांदेड (प्रतिनिधी)–** भाग्यनगर यासोबतच शहरात सतत सराईत गुन्हे करून शहराच्या शांततेला गालबोट ला-वणारा प्रभातनगर भागातील रोहित उर्फ मोनू पुंडगे (वय २४) याची रवानगी छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात करण्यात आली आहे. त्याच्या स्थानपद्धतीचा अहवाल पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी वरिष्ठांकडे पाठवला होता.

जिल्ह्यामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी, MPD अंतर्गत सन २०२५ वर्षामध्ये ३७ सराईत गुन्हेगारास कारागृहामध्ये स्थानबध्द करण्यात आले आहे. सन २०२६ या चालू वर्षामध्ये हा पहिला MPD आहे. अनेक गुन्हेगार हे रडारवार आहेत. त्याचबरोबर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सन २०२४-२०२५ मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे एकूण १६५ गुन्हेगारांना हद्दपार केले आहे. तसेच सन २०२५ मध्ये महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ प्रमाणे एकूण ३५ गुन्हेगारांना हद्दपार करण्यात आले आहे. सर्वसामान्य, शांतताप्रिय नागरिकांना त्रास देणारे उपद्रवी गुन्हेगारांवर पोलिसांची बारकाईने नजर असून, अशा गुन्हेगारांवर स्थानबद्धसारखी कठोर कारवाई करण्यात येत आहे.



स्थानबद्ध करण्यात आलेला गुन्हेगार रोहित ऊर्फ मोनू माधवराव पुंडगे याचे विरुद्ध अल्पवयीन मुलीस अपहरण करून लैंगीक अत्याचार करणे, अल्पवयीन मुलीस फुस लावून पळवून नेणे, अवैधरित्या शस्त्र ताब्यात बाळगुन दंगा करून सार्वजनिक शांतता भंग करणे, शस्त्राचा वापर करुन दुखापत करणे, गंभीर दुखापत करणे, खुनाचा प्रयन करणे असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. एकंदरीत तो गंभीर स्वरुपाचे गुन्हेगारी कृत्य करीत असल्यामुळे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी सदर गुन्हेगारास MPD अधिनियमाप्रमाणे स्थानबध्द करणे बाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक यांच्याकडे सादर केला होता. सदरच्या गुन्हेगारास एक वर्षाकरिता स्थानबध्द करण्याबाबतची शिफारस जिल्हादंडाधिकारी यांच्याकडे केल्यावरुन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सदर प्रस्तावातील नमूद गुन्हेगारास एक वर्षाकरिता मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे चझऊ कायद्याअंतर्गत स्थानबध्द करण्याबाबतचे दि. ९ जानेवारी रोजी आदेश पारीत केले आहेत.

### 'यशवंत'मधील संशोधक भारत कदम यांना पीएच.डी. प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी)–** श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र संशोधन केंद्रातील संशोधक भारत रावसाहेब कदम यांना 'बायलॉजिकल स्टडीज ऑन सिस्टोड पॅरासाईट्स ऑफ मॅमल्स' या विषयावर प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय शामराव नंनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवी प्राप्त झाली आहे.

या संशोधनात त्यांनी सिस्टोड परजीवींचे वर्गीकरण, जैवरासायनिक अभ्यास, पापुलेशन डायनॅमिक्स तसेच हिस्टोपॅथोलॉजी या विविध पैलूंवर सविस्तर अभ्यास केला आहे. या संशोधनाच्या अनुषंगाने त्यांचे तीन दर्जेदार संशोधन पेपर्स नामांकित संशोधन जर्नल्समध्ये प्रकाशित झाले आहेत.

# जागतिक हिंदी दिनानिमित्त आयोजित व्याख्यानमालेला उत्स्फुर्त प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)–** श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित यशवंत महाविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने माजी प्र-कुलगुरु प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक हिंदी दिनानिमित्त हिंदी भाषेचे जागतिक महत्त्व या विषयावर विशेष व्याख्यान दि. १० जानेवारी रोजी वाणिज्य विभाग स्मार्ट क्लास येथे संपन्न झाले. प्रमुख वक्ते महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथील हिंदी विभागाचे डॉ. बसवेश्वर नागोराव बेंद्रे उपस्थित होते. अध्यक्षस्थान हिंदी विभागप्रमुख डॉ. संदीप पाईकराव यांनी भूषविले.

सूत्रसंचालन व प्रास्ताविक हिंदी विभागातील डॉ. साइनाथ साहू यांनी केले तर आभार डॉ. विद्या सावते यांनी मानले.

या प्रसंगी हिंदी विभागातील



प्राध्यापकवर्ग तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. प्रारंभी डॉ. साइनाथ साहू यांनी जागतिक हिंदी दिनाचे महत्त्व विशद करताना सांगितले की, हिंदी ही केवळ भारताची राजभाषा नसून जगातील अनेक देशांमध्ये बोलली व समजली जाणारी प्रभावी भाषा आहे. या व्याख्यानाच्या आयोजनामागील उद्देश स्पष्ट करताना त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये हिंदीच्या जागतिक स्वरूपाविषयी जागरूकता निर्माण करणे हाच या कार्यक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे सांगितले.

प्रमुख वक्ते डॉ. बसवेश्वर बेंद्रे यांनी हिंदी भाषेचा ऐतिहासिक विकास, सांस्कृतिक पाया आणि जागतिक विस्तार यावर सविस्तर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, हिंदीने आता राष्ट्रीय सीमांच्या पलीकडे जाऊन आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली सशक्त उपस्थिती नोंदवली आहे. संयुक्त राष्ट्र संघ, आंतरराष्ट्रीय परिसंवाद तसेच जगभरातील अनेक विद्यापीठांमध्ये हिंदीचा अभ्यास केला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. बसवेश्वर बेंद्रे यांनी पुढे सांगितले की, प्रवासी भारतीयांमुळे हिंदी भाषा अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, मॉरिशस, फिजी आणि सुरिनामसारख्या देशांमध्ये लोकप्रिय होत आहे. तंत्रज्ञान, सोशल मीडिया, सिनेमा आणि डिजिटल माध्यमांनी हिंदीच्या जागतिक प्रसारात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विद्यार्थ्यांनी हिंदीकडे रोज-गार, संशोधन आणि जागतिक संवादाच्या दृष्टीने पाहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. संदीप पाईकराव यांनी हिंदी ही केवळ एक भाषा नसून भारतीय संस्कृती आणि जीवनदृष्टीची संवाहक आहे. प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात शैक्षणिक व साहित्यिक उपक्रमांचे नियमित आयोजन केले जात असून, ते विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. हिंदी विभागाच्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुक करत विद्यार्थ्यांना हिंदीबद्दल आत्मगौरव बाळगण्याचा संदेश दिला. शेवटी डॉ. विद्या सावते यांनी आभार मानले. उपस्थित विद्यार्थ्यांनी व्याख्यान अत्यंत ज्ञानवर्धक व प्रेरणादायी असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

# माहूर येथे मुस्लीम समाजाचा तीन तालुक्यात दोन दिवसीय इज्तेमा उत्साहात

**माहूर (प्रतिनिधी)** –मुस्लिम समाजाच्या धार्मिक सुधारणेची चळवळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तबलीगी जमातच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या माहूर येथील दोन दिवसीय इज्तेमाचा शनिवार, दि. १० जानेवारी रोजी यशस्वी समारोप झाला. या धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडला.



इज्तेमा म्हणजे धार्मिक संमेलन असून, हा इज्तेमा हिमायतनगर, किनवट व माहूर या तीन तालुक्यांचा संयुक्तपणे पार पडला. सुमारे दहा एकर परिसरात अत्यंत भव्य स्वरूपात या इज्तेमाचे आयोजन करण्यात आले होते. इज्तेमाच्या निमित्ताने पंचक्रोशीतील हजारो मुस्लीम बांधव एकत्र आले होते. सर्वांच्या कल्याणासाठी व सामाजिक हितासाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

प्रेषित मोहम्मद पैगंबर यांनी दाखविलेल्या मार्गावर चालावे, प्रत्येकाने सज्जनतेने व नम्रतेने वागावे, तसेच कोणालाही त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, असे मौलांनी मार्गदर्शन करताना आवर्जून सांगितले. विशेष बाब म्हणजे इज्तेमामध्ये कोणत्याही प्रकारचा खर्च न करता अत्यंत साधेपणाने काही जोडप्यांचे विवाहही पार पडले. संपूर्ण कार्यक्रम शांततामय व सौहार्दपूर्ण वाता-वरणात पार पडला.

इज्तेमाचा समारोप शनिवार दि. १० जानेवारी रोजी करण्यात आला. यावेळी सामाजिक सलोखा व सर्वधर्मीय सौहार्दासाठी विशेष प्रार्थना करण्यात आली.

यावेळी मौलाना साद अब्दुल्ला (नांदेड) यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये सांगितले की, मुस्लिमांसाठी ईमानची ताकद आणि इस्लामी शिष्टाचार अत्यंत महत्त्वाचा आहे. देशही मुस्लिमांसाठी तितकाच महत्त्वाचा आहे. मुस्लिमांनी एकत्र येऊन सामाजिक सौहार्द जपले पाहिजे तसेच सामाजिक व शैक्षणिक सुधारणेकडे लक्ष दिले पाहिजे, असाही उपदेश केला.

# सीए विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी; आयसीएआयने लॉंच केली 'ई-डायरी'

**चार्टर्ड अकाउंटन्सीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) ने तुमच्यासाठी ई-डायरी नावाचे एक नवीन प्लॅटफॉर्म लॉंच केले आहे. ही एक डिजिटल प्रॅक्टिकल ट्रेनिंग डायरी आहे, जी विद्यार्थ्यांपासून ते आयसीएआय सदस्यांपर्यंत सर्वांसाठी उपयुक्त आहे. सीए आर्टिकलशिप ट्रेनिंग सुधारण्यासाठी, संपूर्ण पारदर्शकता आणण्यासाठी आणि सर्वांच्या सोयीची खात्री करण्यासाठी, सीए विद्यार्थ्यांसाठी ई-डायरी सुरू करण्यात आली आहे. ती १ जानेवारी २०२६ पासून उपलब्ध आहे.**

## ई-डायरीची पाच प्रमुख वैशिष्ट्ये

» आर्टिकलशिप प्रशिक्षणार्थीची दैनंदिन उपस्थिती आणि कामे ऑनलाइन ई-डायरीमध्ये नोंदवली जातील. पेमेंट केल्यानंतर स्टायपेंड तपशील देखील प्रविष्ट केला जाईल. प्रशिक्षणाच्या पहिल्या १५ दिवसांत हे अद्यतनित करणे आवश्यक असेल.

» सीए आर्टिकलशिप प्रशिक्षणार्थींना दर १५ दिवसांनी येथे त्यांचे कामाचे तपशील प्रविष्ट करावे लागतील. सर्व आवश्यक तपशील भरावे लागतील, अन्यथा, सबमिशन होणार नाही. त्यानंतर प्राचार्य त्याच प्लॅटफॉर्मवर त्याचे पुनरावलोकन आणि मान्यता देऊ शकतील.

» विद्यार्थी कधीही त्यांच्या मागील नोंदी पाहू शकतील, प्रिंसिपलच्या सल्ल्यानुसार बदल करू शकतील आणि मंजुरीची स्थिती ऑनलाइन तपासू शकतील.

» सीए विद्यार्थी त्यांच्या एसएसपी क्रेडेन्शियल्स



(विक्री सेवा पोर्टल) वापरून ई-डायरीमध्ये प्रवेश करू शकतात.

» हे प्लॅटफॉर्म फॉर्म १०९ शी देखील जोडलेले आहे. ते आयसीएआय प्रशिक्षण मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रविष्ट केलेल्या नोंदी जुळवण्याची सुविधा देखील प्रदान करते.

# प्रगतीमंत्र

## परीक्षेशिवाय सरकारी बँकेत नोकरी मिळण्याची संधी, पगार पॅकेजदेखील चांगले

**सरकारी बँकेत नोकरी मिळण्याची चांगली संधी आहे. इंडियन बँकेची उपकंपनी असलेली IndBank मर्चंट बँकिंग सर्व्हिसेस लिमिटेडने (IBMBS LTD) रिलेशनशिप मॅनेजर, डिजिटल मार्केटिंग स्पेशालिस्ट, सेक्रेटरीएट ऑफिसर आणि डीलर या पदांसाठी अर्ज मागवले आहेत. पात्र उमेदवार www.indbankonline.com या अधिकृत वेबसाइटद्वारे अर्ज करू शकतात. फॉर्म ऑफलाइन बँकेत जमा करावा लागेल.**



### पदाचे नाव, रिक्त पदे अन् पगार

| | | |
|---|---|---|
| रिलेशनशिप मॅनेजर | १० | ४-५ लाख वार्षिक |
| डिजिटल मार्केटिंग स्पेशालिस्ट | ०१ | ५-८ लाख वार्षिक |
| बॅक ऑफिससाठी सेक्रेटरीएट ऑफिसर-ट्रेनी | ०१ | ३.५० लाख वार्षिक |
| स्टॉक ब्रोकिंग टर्मिनल्ससाठी डीलर | ०८ | ४.२० लाख वार्षिक |

### अर्ज कसा करावा?

अर्ज करण्यासाठी तुम्हाला बँकेच्या अधिकृत वेबसाइटवरून अर्ज फॉर्म डाउनलोड करावा लागेल. सर्व माहिती हाताने भरावी लागेल. ती कुरिअर किंवा नोंदणीकृत पोस्टद्वारे बँकेला पाठवावी लागेल. पत्ता आहे : मुख्य प्रशासन, क्रमांक-४८०, पहिला मजला खिवराज कॉम्प्लेक्स I, अण्णा सलाई, नंदनम, चेन्नई-३५. स्कॅन केलेली प्रत recruitment@indbankonline.com वर देखील पाठवावी लागेल. भरती प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी उमेदवार बँकेच्या अधिकृत वेबसाइटला भेट देऊ शकतात.

» शैक्षणिक पात्रता : रिलेशनशिप मॅनेजर पदासाठी अर्ज करण्यासाठी, मान्यताप्राप्त विद्यापीठातून मार्केटिंग/फायनान्समध्ये एमबीए (एमबीए) सह किमान दोन वर्षांचा अनुभव आवश्यक आहे. पोस्टिंग अहमदाबाद, बेंगळुरू, चेन्नई, हैदराबाद, लखनऊ, दिल्ली, मुंबई इत्यादी ठिकाणी असतील. डिजिटल मार्केटिंग स्पेशालिस्ट पदासाठी, संगणक विज्ञान/व्हिज्युअल कम्युनिकेशनमध्ये पदवीधर असलेल्याला प्राधान्य दिले जाईल. पदवीसोबत संबंधित क्षेत्रात ४-५ वर्षांचा अनुभव असावा. ही पदे चेन्नईसाठी आहेत. सचिवालय अधिकाऱ्यासाठी एक वर्षाचा अनुभव असलेले पदवीधर असणे आवश्यक आहे. डीलरसाठी NISM पात्रता आणि किमान एक वर्षाचा अनुभव असलेले पदवीधर असणे देखील आवश्यक आहे.

» वयोमर्यादा : उमेदवारांचे वय पदानुसार २१ ते ४० वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक आहे. वय १ जानेवारी २०२६ रोजी मोजले पाहिजे.


» निवड प्रक्रिया : उमेदवारांची निवड मुलाखतीद्वारे केली जाईल. कोणतीही लेखी परीक्षा होणार नाही.

# श्रेयकची कहाणी हृदयाला भिडेल!

MBBS नंतर यूपीएससी तयारी, परीक्षेत 35 वा क्रमांक... तरीही तो आयएएस अधिकारी झाला नाही.

**कधी कधी आपल्या आयुष्यात असे क्षण येतात जे आपल्याला आपले विचार बदलण्यास भाग पाडतात. आपण लोकांच्या वेदना आणि दुःख पाहून विचार करू लागतो. लोकांना मिळणारे फायदे केवळ कागदावरच राहू नयेत, तर ते जमिनीवर अंमलात आणले जावेत यासाठी आपण निर्णय घेतो. श्रेयक गर्गने तेच केले. त्याला डॉक्टर व्हायचे होते, म्हणून त्याने प्रथम एमबीबीएसचा अभ्यास केला. इंटर्नशिप दरम्यान त्याने काही समस्या जवळून पाहिल्या आणि त्याचे मन बदलले. त्याने सिव्हिल सर्व्हिस निवडली. ३५ व्या क्रमांकासह यूपीएससीमध्ये टॉप केले, परंतु तो आयएएस अधिकारी झाला नाही, तर आयएफएस पद मिळवले. या यशोगाथेत, आपल्याला वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर सिव्हिल सर्व्हिसमध्ये सामील होण्याचे हृदयस्पर्शी कारण कळते...**

## हरियाणाचा रहिवासी, महाराष्ट्रातून एमबीबीएस



श्रेयक सांगतो, की तो हरियाणाच्या सोनीपत जिल्ह्यातील आहे. त्याचे वडील दीनबंधू छोटू राम हे विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्यापीठ, मूरथल येथे प्राध्यापक आहेत. सुरुवातीच्या शिक्षणानंतर श्रेयकला डॉक्टर व्हायचे होते, म्हणून त्याने महाराष्ट्रातील महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्थेतून एमबीबीएस पूर्ण केले. वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर यूपीएससीचा प्रवास करण्याचे कारण हृदयस्पर्शी आहे. एमबीबीएसचा अभ्यास करताना तो ग्रामीण भागात इंटर्नशिप करत होता. या काळात त्याने लोकांच्या समस्या जवळून पाहिल्या. लोकांचे दुःख पाहून तो नागरी सेवेकडे वळला.

## दोनदा नापास, तिसऱ्या प्रयत्नात टॉप

श्रेयकने वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर यूपीएससी परीक्षा दिली. अभ्यास न करता त्याने पहिला प्रयत्न केला. त्यानंतर त्याने २०२३ मध्ये पुन्हा प्रयत्न केला आणि प्रिलिम्स उत्तीर्ण झाले. मात्र मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला नाही. तिसऱ्या प्रयत्नात, त्याने अधिक मेहनत घेतली आणि यूपीएससी २०२४ च्या परीक्षेत टॉप केले आणि ३५ वा क्रमांक मिळवला.

### आयएएस झाला नाही...

सामान्यतः, यूपीएससी सीएसई परीक्षेत उच्च क्रमांक मिळवणारे उमेदवार आयएएस होतात. तथापि, श्रेयकने त्याच्या पसंतींमध्ये आयएएसला त्याची पहिली पसंती म्हणून सूचीबद्ध केले नाही आणि परराष्ट्र सेवा निवडली. त्यामुळे, त्याला आयएफएस पदाची ऑफर देण्यात आली.

### सोशल मीडियापासून अंतर ठेवून...

यूपीएससीची तयारी करताना श्रेयक सोशल मीडियापासून पूर्णपणे दूर राहिला. तो टीव्ही पाहत असे. तो रोज ६ ते ९ तास अभ्यास करत असे. त्याचे ध्येय टॉप-१०० रँक मिळवणे होते आणि नंतर त्याचे स्वप्न सत्यात उतरले. श्रेयकची कहाणी समाजात बदल घडवून आणण्याच्या इच्छेने नागरी सेवेत प्रवेश करणाऱ्या सर्व तरुणांना प्रेरणा देते.

# बिझनेस

**कपडे धुऊन करोडपती बनता येते का? हो, ते अगदी शक्य आहे. झारखंडमधील भागलपूर येथे जन्मलेल्या अरुणाभ सिन्हाने ते करून दाखवले आहे. ते फक्त एक किंवा दोन कोटी रुपयांचे नाही तर कोट्यवधींचे आहे. त्याने त्याची पत्नी गुंजन तनेजासोबत २०१७ मध्ये UClean नावाची लॉन्ड्री आणि ड्राय क्लीनिंग कंपनी सुरू केली. आज त्याच्या कंपनीची वार्षिक उलाढाल १०० कोटींपेक्षा जास्त आहे.**



## कपडे धुऊन बनला करोडपती! कधीकाळी रिक्षा प्रवासालाही पैसे नव्हते...

अरुणाभने आयआयटी बॉम्बेमधून पदवी प्राप्त केली. त्याचे वडील सरकारी रुग्णालयात सहाय्यक होते. त्याची आई गृहिणी होती. तो तीन भावंडांमध्ये सर्वात धाकटा आणि एकुलता एक मुलगा होता. त्याचे कुटुंब एका छोट्या सरकारी क्वार्टरमध्ये राहत होते. लहानपणी त्याला शाळेत जाण्यासाठी अनेक किलोमीटर चालावे लागत असे. त्याला रिक्षाचे भाडेही परवडत नव्हते. अरुणाभ एक हुशार विद्यार्थी होता. त्याने आयआयटी बॉम्बेमधून मॅटलर्जी आणि मटेरियल सायन्स विषयात पदवी पूर्ण केली. त्याची क्षमता ओळखून, त्याला टाटा स्टील आणि झेडएस असोसिएट्स सारख्या मोठ्या कंपन्यांकडून नोकरीच्या ऑफर आल्या. टाटा स्टीलने त्याला दरवर्षी ४.५ लाख रुपयांचे, तर झेडएस असोसिएट्सने दरवर्षी ८.९ लाख रुपयांचे पॅकेज देऊ केले होते. त्यावेळी अरुणाभने झेडएस असोसिएट्स निवडले आणि पुण्यात काम करू लागला.

### स्वत:चा स्टार्टअप सुरू केला

२०११ मध्ये अरुणाभने स्वतःची कन्सल्टिंग फर्म फ्रँग्लोबल (Franglobal) सुरू केली. त्याचा उद्देश परदेशी कंपन्यांना भारतात त्यांचे व्यवसाय सुरू करण्यास मदत करणे हा होता. त्याचे पहिले गुंतवणूकदार गौरव मार्या होते, जे फ्रँचायझी इंडियाचे संस्थापक होते. त्याने अरुणाभला अंदाजे ५० लाख रुपये दिले. २०१५ मध्ये, अरुणाभने फ्रँग्लोबलला फ्रँचायझी इंडियाला विकले.



### लक्षात आली लोकांची समस्या

२०१५ मध्ये अरुणाभने गुंजन तनेजाशी लग्न केले आणि ट्रीबो या बजेट हॉटेल चेनमध्ये नोकरी सुरू केली. ट्रीबोमध्ये काम करत असताना, अरुणाभला एक मोठी समस्या लक्षात आली: हॉटेल ग्राहकांना घाणेरडे टॉवेल, चादरी आणि पडदे यासारख्या वस्तूंमुळे समस्या येत होत्या. अरुणाभला लक्षात आले की कपडे धुण्याची सेवा एक मोठी संधी देते. ही एक अशी बाजारपेठ होती जी ९९% असंघटित होती आणि पूर्णपणे पारंपरिक धोब्यांवर अवलंबून होती. अरुणाभला वाटले की ते व्यावसायिक सेवेत रूपांतरित केले जाऊ शकते.

### 2017 मध्ये सुरू केली यू क्लीन

२०१६ मध्ये अरुणाभने ट्रीबो सोडला आणि त्याची पत्नी गुंजनसह २०१७ मध्ये यूक्लीन कंपनी सुरू केली. कंपनीचे नाव युकॉनसेप्ट्स सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड होते. सुरुवातीला निधी उभारणे खूप कठीण होते. अरुणाभने अंदाजे ५०-६० गुंतवणूकदारांशी चर्चा केली. त्यांना त्याची कल्पना आवडली, परंतु कोणीही धोका पत्करण्यास तयार नव्हते. त्यामुळे अरुणाभ निराश होऊन प्रयत्न सोडून देणारच होता, त्याचदरम्यान त्याला दिल्ली-एनसीआरमध्ये सहा पारंपरिक



ड्राय क्लीनिंग स्टोअर्सचा मालक असलेला गुंतवणूकदार सापडला. या गुंतवणूकदाराने त्याच्या दोन स्टोअर्सपैकी दिल्लीतील वसंत कुंज येथील स्टोअर अरुणाभला आणि दुसरे गुरुग्राममधील स्टोअर सुशांत लोक यांना भाड्याने दिले. या दुकानांना UClean मॉडेलमध्ये रूपांतरित करण्यासाठी त्यांनी २५ लाख रुपयांची गुंतवणूक केली. त्यांनी अरुणाभला व्यावसायिक वॉशिंग मशीन, स्टीम टेबल आणि संगणकांसह आवश्यक उपकरणे पुरवली. अरुणाभने कर्मचाऱ्यांचे पगार, वीज बिल आणि डिटर्जंट खर्च भागवला.

### कंपनी फ्रँचायझी मॉडेलकडे वळली...

UClean ने लवकरच फ्रँचायझी मॉडेलद्वारे विस्तार करण्याचा निर्णय घेतला. ग्राहक ॲप आणि वेबसाइटद्वारे सहजपणे ऑर्डर देऊ शकतात. ते त्यांच्या पसंतीच्या वेळी मोफत पिकअप आणि डिलिव्हरीचा लाभ घेऊ शकतात. UClean २४ तासांच्या आत धुतलेले आणि इस्त्री केलेले कपडे देतात. इस्त्री करणे पर्यायी आहे. कंपनीची मुख्य सेवा 'किलोनुसार कपडे धुणे' आहे, जी शहरानुसार बदलते.

### किती कमाई?

आज UClean केवळ भारतातच नाही तर इतर देशांमध्ये देखील सेवा प्रदान करते. कंपनीचे ८०० हून अधिक आउटलेट आहेत आणि त्यांचा टर्नओव्हर १६० कोटींपेक्षा जास्त आहे. अरुणाभची कहाणी दर्शवते की जर तुमच्याकडे चांगली कल्पना असेल आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी असेल तर तुम्ही कोणत्याही आव्हानावर मात करू शकता आणि यश मिळवू शकता.

# सिगारेट उद्योग प्राणघातक कसा घोषित झाला?

**६० आणि ७० च्या दशकात सिगारेट ओढणे हे केवळ व्यसन नव्हते, तर ते ग्लॅमरचे प्रतीक होती. पण जसजशी समाजाला धूम्रपानाच्या धोक्यांची जाणीव झाली तसतसे चित्रपटांमध्ये त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला. आता अशी वेळ आली आहे, की चित्रपटांपूर्वी धूम्रपानामुळे होणाऱ्या कर्करोगाबद्दलचे इशारे दिसू लागले आहेत. सिगारेटच्या पाकिटांवरही इशारे छापलेले असतात.**

११ जानेवारी १९६४ रोजी अमेरिकेचे डॉ. लूथर टेरी यांनी तंबाखूचा कर्करोगाशी संबंध जोडणारा अहवाल प्रसिद्ध केला. सुमारे ७,००० वैज्ञानिक लेखांचे पुनरावलोकन केल्यानंतर, अहवालात प्रथमच अधिकृतपणे मान्य करण्यात आले की धूम्रपान हे फुफ्फुसांच्या कर्करोगाचे मुख्य कारण आहे. त्यानंतरच सिगारेटच्या पाकिटांवर चेतावणी अनिवार्य करण्यात आली आणि दूरदर्शन जाहिरातींवर बंदी घालण्यात आली. यामुळे तंबाखूला त्याच्या 'ग्लॅमरस' प्रतिमेतून काढून टाकण्यात आले आणि ते 'घातक' घोषित करण्यात आले.

## 70 लाख कोटी रुपयांचा उद्योग

जागतिक सिगारेट उद्योग अंदाजे ७७० अब्ज डॉलर (अंदाजे ७० लाख कोटी रुपये) किमतीचा असल्याचा अंदाज आहे. हा उद्योग दरवर्षी २.२५ टक्के दराने वाढत आहे. २०३१ पर्यंत, हा उद्योग अंदाजे ८२१ अब्ज डॉलर्सचा असण्याची अपेक्षा आहे. भारतात, हा उद्योग २९.२ अब्ज डॉलर्स (अंदाजे रु. २.६४ लाख कोटी) असण्याचा अंदाज आहे. २०३४ पर्यंत हा उद्योग ६६ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त असू शकतो.

## सिगारेट ओढण्याबद्दल किती दंड?

भारतात सिगारेट ओढण्याबद्दल दंड आहे. घरी सिगारेट ओढल्यास दंड भरावा लागेल असे नाही. सार्वजनिक ठिकाणी बिडी किंवा सिगारेट ओढणे हा दंडनीय गुन्हा मानला जातो. उल्लंघन करणाऱ्यांना किमान २०० रुपये दंड होऊ शकतो, जो ५०० रुपयांपर्यंत वाढवता येतो. जर एखाद्या व्यक्तीने दंड भरला नाही तर त्यांच्याविरुद्ध न्यायालयात खटला दाखल करता येतो.

# महाराष्ट्रातल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर पडणार?



**नवी दिल्ली(प्रतिनिधी)**–महाराष्ट्रातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. जिल्हा परिषद निवडणुकीबाबत सर्वोच्च न्यायालयात एक नवी याचिका दाखल झाली आहे. या याचिकेचा निकाल आल्यानंतर राज्य निवडणूक आयोग १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्याची शक्यता आहे.

राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्यात याव्यात, अशी मागणी करणारी नवी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर सोमवारी सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारीपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. पण ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून जिल्हा परिषदांच्या बाबतीत पेच निर्माण झाला आहे. नगरपालिका, नगरपंचायती आणि नागपूर-चंद्रपूर महापालिकांच्या निवडणुका ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली असली तरी, न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून घेण्यास परवानगी मिळाली आहे.

केवळ ५० टक्के आरक्षणाची मर्यादा पाळणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्याच निवडणुका घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. यामुळे राज्य निवडणूक आयोगाने पहिल्या टप्प्यात २८८ नगरपालिकांच्या निवडणुका घेतल्या. आता राज्यातील सर्व म्हणजेच २९ महापालिकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान आणि १६ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे. उर्वरित २० जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली जात असल्याने आयोगाने तिथे निवडणुका घेण्यास असमर्थता दर्शवली आहे. यात प्रामुख्याने विदर्भ आणि मराठवाडा येथील जिल्हा परिषदा आहे.

सोलापूर जिल्ह्यातील कुडूवाडी येथील जिल्हा परिषद पंचायत समिती मेंबर्स असोसिएशनचे पदाधिकारी कैलास जगन्नाथ गोरे यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. नगरपालिका आणि महापालिकांप्रमाणेच जिल्हा परिषदांनाही ५० टक्के आरक्षणाची अट शिथिल करून निवडणुका घेण्याची परवानगी द्यावी अशी मागणी त्यांनी केली आहे. केवळ १२ जिल्ह्यांत निवडणुका न घेता, राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या निवडणुका 'अंतिम न्यायालयीन निर्णयाच्या अधीन' राहून एकाच वेळी घेतल्या जाव्यात, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

## आमच्यावर बॉम्ब फेकले तर अमिरेकेचे..., तणाव वाढत असताना इराणची थेट धमकी

**इरान** – एकीकडे इराणमध्ये सत्ताविरोधी आंदोलन तीव्र झालेलं असतानाच दुसरीकडे अमेरिकेकडूनही इराणमधील शासकांवर दबाव आणला जात आहे. त्यामुळे इराण आणि अमेरिकेमध्ये कमालीचा तणाव वाढला आहे. अशा परिस्थितीत इराणी संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाकर गालिबाफ यांनी एका तातडीच्या बैठकीनंतर मोठं विधान केलं आहे. अमेरिकेने इराणवर हल्ला केला तर इराण गप्प पसणार नाही. अशा परिस्थितीत इस्राइल आणि मध्य पूर्वेकडे असलेले अमेरिकेचे लष्करी आणि नौदलाच्या तळांना लक्ष्य केलं जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

गालिबाफ यांनी सांगितले की, इराणवर वेगवेगळ्या पद्धतीने दबाव आणला जात आहे. तसेच देशाला अनेक आघाड्यांवर आव्हानांचा सामना करावा लागत आहे. आता ही लढाई केवळ हत्यारांपर्यंत मर्यादित राहिलेली नाही तर यामध्ये आर्थिक निर्बंध, अपप्रचार आणि सुरक्षेशी संबंधित आव्हानांचाही समावेश झाला आहे.

# कोव्हिड काळ गाजवणाऱ्या डॉ. संग्राम पाटील यांना मुंबई पोलिसांनी का घेतले ताब्यात?

**मुंबई (प्रतिनिधी)** – केंद्र सरकार आणि भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांवर टीकात्मक मांडणी केल्याच्या आरोपावरून लंडनस्थित डॉक्टर संग्राम पाटील यांना मुंबई पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. मुंबई विमानतळावरून आज सकाळी त्यांना ताब्यात घेतले. मुंबईतील ना.म. जोशी पोलीस स्टेशनमध्ये त्यांची चौकशी सुरू आहे. भाजपच्या एका कार्यकर्त्याने केलेल्या तक्रारीवरून डॉ. पाटील यांना ताब्यात घेतले आहे.

संग्राम पाटील हे वैद्यकीय क्षेत्रात गेली अनेक वर्षे कार्यरत आहेत. सध्या ते ब्रिटनमध्ये वैद्यकीय सेवा बजावत आहेत. कोरोना काळात भारतात भीतीदायक वातावरण असताना त्यांच्या समाज माध्यमांवरून ते लोकांना धीर देत होते. तसेच भारत सरकारच्या अनेक योजना आणि निर्णयांवरही ते आपली मते मांडत असतात. यातूनच



त्यांची प्रतिमा भारतसरकारविरोधी असल्याचा आरोप केला जातो.

डॉ. संग्राम पाटील यांनी त्यांच्या फेसबुक खात्यावरून भाजपच्या राष्ट्रीय नेत्यांची प्रतिमा मलिन करण्याकरिता तसेच भाजप विचारधारेचे समर्थन करणारे आणि त्याचा विरोध करणारे समाजातील गटांमध्ये शत्रुत्वाची भावना निर्माण करण्याच्या इराद्याने चुकीची आणि खोटी माहिती पसरवली, असा आरोप भाजप कार्यकर्ते निखिल भामरे यांनी केला आहे.

निखिल श्यामराव भामरे, (वय २५, रा. ठाणे) मी भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाचा सोशल मीडिया सहसंयोजक म्हणून काम पाहतो. तसेच मी विविध इलेक्ट्रॉनिक सोशल मीडियाद्वारे आमच्या पक्षाची कार्यपद्धती आणि पक्षाचे कामकाजाबाबत नियमितपणे पाहणी करीत असतो.

आज दि. १८/१२/२०२५ रोजी मी नेहमी प्रमाणे कारणे पक्ष कार्यालयात येत असताना नेहमीप्रमाणे सोशल मीडियावर सक्रिय होतो. त्यावेळी डिझाईल रोड लोअर परेल मोनो रेल स्टेशन जवळून जात असताना १०.१९ वाजताचे दरम्यान माझ्या निदर्शनास आले की, शहर विकास आघाडी या फेसबुक खातेदाराकडून त्याचे फेसबुक खात्यावर दि. १४/१२/२०२५ रोजी ०१.५८ वा खालील लिंक मध्ये आक्षेपार्ह मजकूर प्रसारित केल्याचे मी पाहिले. सदर प्रसारित केलेला मजकूर हा आमच्या पक्षाच्या भारतातील प्रमुख नेत्यांबद्दल तसेच आमच्या पक्षाबद्दल द्वेषता पसरवण्यासाठी प्रसारित केल्याचे दिसून येत आहे.

# मुक्त विद्यापीठाचा आणखी एक कौशल्याधिष्ठित नाविन्यपूर्ण शिक्षणक्रम

## मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती कायदेतज्ज्ञांची विशेष उपस्थिती



**नाशिक (प्रतिनिधी):** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या निरंतर शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षण विद्याशाखेच्या वतीने 'कार्यालयीन सहाय्यक (न्यायिक) लिपिक संवर्ग पदविका' या विशेष शिक्षणक्रमाचा शुभारंभ रविवारी दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. विद्यापीठाच्या शैक्षणिक सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाचे न्यायमूर्ती श्री. संदीपकुमार मोरे व न्यायमूर्ती श्री. अभय मंत्री प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते.

व्यासपीठावर महाराष्ट्र व गोवा राज्य बार कौन्सिलचे अध्यक्ष श्री. हर्षद निंबाळकर, नाशिकचे प्रधान जिल्हा न्यायाधीश श्री. श्रीचंद जगमलानी, निफाडचे जिल्हा न्यायाधीश श्री. अ. अ. अ. शेख, विद्यापीठाचे प्र – कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, निफाड वकील संघाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ अँड. इंद्रभान रायते, विद्यापीठाचे निरंतर शिक्षण विद्याशाखा आणि व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखा संचालक प्रा. डॉ. जयदीप निकम यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना न्यायमूर्ती श्री. संदिपकुमार मोरे म्हणाले की डॉक्टर्स इंजिनियर्स असे पारंपारिक शिक्षणक्रमांव्यातिरिक्त अनेक कौशल्याधिष्ठीत कामे आहेत, ज्याचे रीतसर प्रशिक्षण घेवून युवकांना चांगला रोजगार मिळू शकतो. मुक्त विद्यापीठाने 'कार्यालयीन सहाय्यक (न्यायिक) लिपिक संवर्ग पदविका' शिक्षणक्रमाचा शुभारंभ करून चांगले व बहुमोल कार्य केले आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. तसेच यापुढे लघुलेखक (स्टेनो) विषयी शिक्षणक्रम आणि इतर काही दुर्लक्षित परंतु महत्वपूर्ण शिक्षणक्रमांकडे वळावे असे आवाहन केले. न्यायमूर्ती श्री. अभय मंत्री यांनी मुक्त विद्यापीठाने न्यायव्यवस्थेच्या नेमक्या गरजा ओळखून हा शिक्षणक्रम सुरु केल्याचे गौरवोद्गार काढले. या शिक्षणक्रमामुळे शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांना एक चांगला पर्याय उपलब्ध झाला आहे. तसेच यामुळे न्यायालयीन कामकाज करणाऱ्या व्यक्तींच्या कामकाजात अधिक सुलभता येणार असल्याचे सांगितले. अध्यक्षपदावरून बोलताना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी अशा अभ्यासक्रमामुळे न्यायालयीन कामकाजात अचूकता आणि गती येईल, असा विश्वास व्यक्त केला. भविष्यात अशा प्रकारचे इतरही कौशल्यधिष्ठित, व्यावसायिक व रोजगाराभिमुख शिक्षणक्रम सुरु करण्यात येतील असे अआश्वासन दिले. तसेच भविष्यात विद्यापीठातर्फे विधी शाखेचा शिक्षणक्रम सुरु करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून त्यासाठी बार कौन्सिलचे व संबंधितांनी सहकार्य करावे असे आवाहन केले.

बार कौन्सिल ऑफ इंडियाचे माजी अध्यक्ष श्री. जयंत जायभावे यांनी मुक्त विद्यापीठ हे सर्व थरातील विद्यार्थ्यांसाठी पंढरपूर असल्याचे अभिमानाने सांगितले. तसेच या शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना अगदी माफक शुल्कात कायदेविषयक दस्तावेज असेलेली 'वेबबँक' उपलब्ध करून दिली जाईल असे आश्वासन दिले.

## राम मंदिराच्या सुरक्षेत मोठी चूक; नमाज पठण करण्याचा प्रयत्न, पोलिसांकडून अटक

**लखनऊ:** अयोध्येतील राम मंदिर ातील सुरक्षा व्यवस्थेत मोठी चूक झाली आहे. एका काश्मिरी व्यक्तीला सुरक्षा दलांनी ताब्यात घेतलं आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, काश्मिरी व्यक्तीनं राम मंदिर परिसराच्या दक्षिणी करकोटे भागात एका व्यक्तीनं नमाज पठण करण्याचा प्रयत्न केला. तो काश्मिरी वेशभूषेत होता. राम मंदिराच्या गेट डी १ मधून आत शिरला होता. अहमद शेख असं पकडण्यात आलेल्या व्यक्तीचं नाव आहे. तो काश्मीरच्या शोपियाचा रहिवासी आहे.

अहमद शेखनं राम मंदिर परिसरात नमाज पठण करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्याला रोखलं. यानंतर शेखनं जोरदार घोषणाबाजी सुरु केली. मग शेखला अटक करण्यात आली. घटनेची माहिती मिळताच गोपनीय यंत्रणा, स्थानिक पोलीस आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी सक्रिय झाले. अहमद शेखची चौकशी सुरु आहे. त्याच्या हेतूंची आणि पार्श्वभूमीची सखोल चौकशी सुरु आहे.

ही घटना आज सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात कारवाई केल्यानंतर जिल्हा प्रशासनानं अद्यापपर्यंत कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. राम मंदिर ट्रस्टनं या संपूर्ण प्रकरणावर मौन बाळगलं आहे. प्रकरण अतिशय संवेदनशील असल्यानं सुरक्षा यंत्रणा प्रत्येक बाबीचा कसून तपास करत आहेत. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून काळजी घेतली जात आहे.

# प्रसिद्ध अभिनेते प्रशांत तमांग यांचे निधन



**नवीदिल्ली(प्रतिनिधी)**– मनोरंजन विश्वातून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. इंडियन आयडॉल ३ चे विजेते, गायक आणि अभिनेते प्रशांत तमांग यांचे निधन झाले आहे. वयाच्या ४६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. दिल्लीतील निवासस्थानी त्यांचा मृतदेह आढळला. मीडिया रिपोर्ट्सनुसार, प्रशांत तमांग यांचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्यामुळे झाला असल्याची माहिती आहे.

डळपसशी रपव लीं झीरीहरपीं ढरारपस: मनोरंजन विश्वातून एक धक्कादायक बातमी समोर येत आहे. इंडियन आयडॉल ३ चे विजेते, गायक आणि अभिनेते प्रशांत तमांग यांचे निधन झाले आहे. वयाच्या ४६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. दिल्लीतील निवासस्थानी त्यांचा मृतदेह आढळला. मीडिया रिपोर्ट्सनुसार, प्रशांत तमांग यांचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्यामुळे झाला असल्याची माहिती आहे.

प्रशांत यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे. इंडियन आयडॉल ३ चे स्पर्धक भावेन धनक यांनी इंडिया टुडेला प्रशांत तमांग यांच्या मृत्यूबाबत माहिती दिली. प्रशांत यांचे आज सकाळी, ११ जानेवारी रोजी दिल्लीत निधन झाले आहे. त्यांच्या निधनानंतर सिनेसृष्टीत शोककळा पसरली आहे.

प्रशांत यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे. इंडियन आयडॉल ३ चे स्पर्धक भावेन धनक यांनी इंडिया टुडेला प्रशांत तमांग यांच्या मृत्यूबाबत माहिती दिली. प्रशांत यांचे आज सकाळी, ११ जानेवारी रोजी दिल्लीत निधन झाले आहे. त्यांच्या निधनानंतर सिनेसृष्टीत शोककळा पसरली आहे.

प्रशांतच्या निधनानंतर भावेनलाही दु:ख झाले आहे. तो म्हणाला, हे सर्व अचानक घडले आहे. प्रशांत तमांग यांच्या मृत्यूबाबत आमच्याकडे अद्याप जास्त माहिती नाही. हृदयविकाराच्या झटक्याने त्याचे निधन झाले असल्याचे वृत्त आहे.

लवकरच त्याच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येईल, अशी माहिती त्याने दिले. त्याने स्पष्ट केले की, प्रशांत काही वर्षांपूर्वी दिल्लीला गेला होता. त्याला गायनासोबत अभिनयाचीही आवड होती. इंडियन आयडॉलच्यावेळी आम्ही रूममेट होतो. तो एक अद्भुत व्यक्ती होता. आपण सर्वांना त्याची नक्कीच आठवण येईल, असंही तो म्हणाला.


## जाहीर प्रगटन

मौजे नरसी, ता. नायगाव (खै.), जि. नांदेड येथील जमिनीबाबत सर्व संबंधित नागरिक, खरेदीदार, वित्तसंस्था व जनतेस कळविण्यात येते की, मौजे नरसी येथील सर्वे नंबर २५२ (क्षेत्र १ हेक्टर १ आर) व सर्वे नंबर २५३ हे पुढे गट क्रमांक ३७५ व गट क्रमांक ३७१ मध्ये रूपांतरित झालेले आहेत. यापैकी सर्वे नंबर २५२ हा प्रत्यक्षात गट क्रमांक ३७५ चा भाग असून, सदर जमिनीवर गंगाबाई पांडुरंग तळणे व महादव रामजी तळणे यांचा कायदेशीर कब्जा आहे. मात्र केवळ कार्यालयीन व अभिलेखीय चूक, खोटी व नामधारी वाढी नोंद व चुकीचा फाळणी बाराचा अंमल झाल्यामुळे सर्वे नंबर २५२ चा काही भाग चुकीने गट क्रमांक ३७१ मध्ये दाखविण्यात आला आहे व त्यावर संभा मसना मांजरमे, खाकी बा. संभाजी मांजरमे व हनुमंत संभाजी मांजरमे यांची नावे अवैधरित्या वाढी नोंद करण्यात आलेली आहेत. सदर बाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अन्वये नवीन अपील व इतर कार्यवाही यल्लप्पा किशन टोकलवाड, गंगाबाई पांडुरंग तळणे व माधव रामजी तळणे यांनी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, नांदेड तसेच उपसंचालक भूमी अभिलेख, संभाजीनगर यांच्याकडे दाखल केलेली असून गट क्रमांक ३७१ व ३७५ हे दोन्ही गट क्रमांक सध्या वादग्रस्त आहेत.

त्यामुळे या वादग्रस्त जमिनीबाबत कोणत्याही व्यक्तीने, संस्थेने किंवा तृतीय पक्षाने खरेदी, विक्री, दान, बक्षीस, गहाण, भाडेपट्टा, करारनामा किंवा कोणताही आर्थिक/कायदेशीर व्यवहार करू नये.

भविष्यात मोजणी किंवा अभिलेख दुरुस्तीमध्ये सदर जमीन गंगाबाई पांडुरंग तळणे व महादेव रामजी तळणे यांच्या नावे/कब्जात दर्शविण्यात आल्यास, त्याबाबत इतर कोणतीही व्यक्ती जबाबदार राहणार नाही. आम्ही सदर जमिनीचा कायदेशीर खरेदीदार व कब्जेदार असून कब्जा सोडणार नाही, कारण ही बाब केवळ कार्यालयीन चुकांमुळे निर्माण झालेली आहे. त्यामुळे आमच्याशी पूर्व लेखी चर्चा व दस्तऐवजीकरणाशिवाय कोणताही व्यवहार केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची राहील. ही जाहीर सूचना सर्वांच्या माहितीसाठी देण्यात येत आहे.

जाहीर प्रगटन देणारे :
पांडुरंग रामजी तळणे, माधव रामजी तळणे
(रा. मौजे नरसी, ता. नायगाव (खै.), जि. नांदेड)
मार्फत : अॅड. अविनाश मधुकरराव निलंगेकर
(नांदेड) दिनांक :११/०१/२०२६ स्थळ : नरसी

## हरवले आहे

चंद्रकलाबाई बाबाराव राक्षसे रा. नंदीग्राम सोसायटी नांदेड या नावाचे नंदीग्राम गृहनिर्माण संस्थेची सभासद असून माझ्या नावे प्लॉट नं. ४६ए अर्धा प्लॉटचे माझ्या नावाने असलेले अलॉटमेंट आणि शेअर सर्टिफीकेट नंदीग्राम सोसायटी ते बसस्टँड ऑटो प्रवासात हरवले आहे.

कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता :- चंद्रकलाबाई बाबाराव राक्षसे**
**रा. नंदीग्राम सोसायटी, नांदेड**

## शेती विकणे आहे

पाटोदा त.ब. ता. नायगाव (खै.) जि. नांदेड स्थित गट क्र. २८७ मधील ०.२६ आर जमीन ज्यासाठी जाण्यासाठी रस्ता असलेली स्वतःच्या मालकीची जमीन योग्य किंमत आल्यास विकणे आहे.

- संपर्क -
मोबाईल नंबर ९९८९२८४२६१

## मालमत्ता दस्तऐवज गहाळ झाल्याचे जाहीर प्रगटन

प्लॉट क्रमांक ४६ १.श्री. अंसाजी बाबाराव घोगरे यांनी श्री.सुरेश अबाजिराव घोगरे यांच्या नावे केलेला, नोंदणी क्रमांक NDG१/५४१३/२००५ असलेला आणि दि. १४/१०/२००५ रोजीचा मूळ नोंदणीकृत विक्री करारनामा. २. श्री. सुरेश अबाजिराव घोगरे यांनी श्री. संतोष इरबाजी हंबर्डे यांच्या नावे केलेला, नोंदणी क्रमांक NDG१/४०७२/२००६ असलेला आणि दि. ११/०८/२००६ रोजीचा मूळ नोंदणीकृत विक्री करारनामा. प्लॉट क्रमांक ७, ८, ९, १०. १. श्री. गंगाप्रसाद रामेश्वरजी तोष्णीवाल यांनी श्रीमती मनीष भास्करराव नळदकर यांच्या नावे केलेला, नोंदणी क्रमांक NDG२/१६४५/२०१४ आणि दि. ०५/०९/२०१४ रोजीचा मूळ नोंदणीकृत विक्री करारनामा. २. श्रीमती मनीष भास्करराव नळदकर यांनी श्री. आशय धनाजीराव देशमुख यांच्या नावे केलेला, नोंदणी क्रमांक NDG२/६३६४/२०१४ आणि दि. २४/०९/२०१४ रोजीचा मूळ नोंदणीकृत विक्री करारनामा. ३. श्रीमती सुनीता दिगंबरराव लाभशेटवार यांनी श्री. आशय धनाजीराव देशमुख यांच्या नावे केलेला, नोंदणी क्रमांक NDG१/८९९०/२०१३ आणि दि. २७/१२/२०१३ रोजीचा मूळ नोंदणीकृत विक्री करारनामा. ४. श्री. गंगाप्रसाद रामेश्वरजी तोष्णीवाल यांनी श्री. आशय धनाजीराव देशमुख यांच्या नावे केलेला, नोंदणी क्रमांक NDG२/५९७४/२०१४ आणि दि. ०५/०९/२०१४ रोजीचा मूळ नोंदणीकृत विक्री करारनामा. जर कोणाला काही आक्षेप असेल किंवा काही प्रकरण असेल तर खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

संपर्क : **अॅड. श्रीकांत गिरी** रा. सिडको रोड कॅन्सर हॉस्पीटलजवळ सिद्धीविनायक संकुल ग्राऊंड फ्लोर फ्लॅट नं. १ नांदेड मो. नं. ९६९६०१५७५७

## Change In Name

My Old Name is SHAIKH JAKIYA TANWIR SK. WAHIDODDIN which now I am changing as New Name JAKIYA TANWIR ABDUL RAHEMAN INAMDAR. Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

## Change In Name

My Old Name is SHAIKH MOHAMMED USMAN SHAIKH MOHAMMED KHAJA which now I am changing as New Name SHAIKH MOHAMMAD OSMAN SHAIKH MOHAMMED KHAJA Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address : 2-5-515 Dulesha Raheman Nagar, Hamza Masjid, Nanded Maharashtra 431604
Mo.No. 9975828220

## Change In Name

My Old Name is MD AAQIBRAZA KHAN MD SIRAJ KHAN which now I am changing as New Name MOHAMMED AQUIB RAZA KHAN MOHAMMED SIRAJ KHAN. Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Address - H.No. 9-5-851/1, Rahmat Nagar, Rahmat Nagar, Itwara Nanded Maharashtra 431604
Mo.No. 9284364187

## Change In Name

My Old Name is MOHD. KARIMODDIN MOHD. JAMALUDDIN which now I am changing as New Name MOHAMMAD KARIMODDIN MOHAMMAD JAMALUDDIN Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
Sign by - MOHAMMAD KARIMODDIN MOHAMMAD JAMALUDDIN
Address : 2/5/1035/2 Sameera Bagh, Waghi Road, Nanded Dist. Nanded 431601 Maharashtra
Mo.No. 8007086781

## Change In Name

My Old Name is ZAKIYA TANVEER SHAIKH WAHEEDUDDIN which now I am changing as New Name JAKIYA TANWIR ABDUL RAHEMAN INAMDAR. Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६


# गोदातीर समाचार


**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




# दुचाकी चोरणारी आंतरराज्यीय टोळी जेरबंद

## २३ लाखांच्या ३५ दुचाकी जप्त; भोकर पोलिसांची कामगिरी

**भोकर (प्रतिनिधी)** –जिल्ह्यात आणि भोकर परिसरात चोरी झालेल्या दुचाकींचा शोध भोकर पोलीस घेत असताना त्यांना आंतरराज्यीय दुचाकी चोरी करणारी टोळी हाती लागली. तीन चोरट्यांना अटक करून त्यांच्याकडून तब्बल २३ लाख रुपये किंमतीच्या ३५ दुचाकी जप्त केल्या आहेत.




सोमवार, दिनांक ५ जानेवारी रोजी यातील फिर्यादी गजानन नागनाथ होनशेटे (वय ४८ वर्षे, व्यवसाय शेती रा. सोनारी ह. मु. अनुसया माता नगर भोकर) यांनी पो. स्टे. भोकर येथे फिर्याद दिली होती की, दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजीचे सकाळी ८ ते संध्याकाळी ६ वाजताचे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांची स्पलेंडर मोटारसायकल जीचा पासिंग क्र. एमएच-२६-वाय-८१७३ ही चोरून नेल्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचे तपासामध्ये भोकरचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी पोउपनि दिलीप जाधव व त्यांचे पथकाला सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेली दुचाकी व अज्ञात आरोपीचा शोध घेणेकामी आदेशीत केले होते.

त्या अनुषंगाने पथक गस्तीवर असताना सोमवार, दिनांक ५ जानेवारी रोजी गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळाली की, एक इसम हा भैंसा ते भोकर रोडने स्पलेंडर प्लस मोटार-सायकलवर त्याचे साथीदारांसह चोरीची मोटारसायकल घेवून येत आहे. या माहितीवरून पथकाने त्यास सदर ठिकाणी सापळा लावून ताब्यात घेवून चौकशी केली असता त्यांनी त्यांचे नावे नवीन ऊर्फ मामू नारायण गुदेवार वय ३३ वर्षे रा. दिवशी बु ता. भोकर, भीमराव ऊर्फ बाळू किशनराव कदम वय २६ वर्षे रा. दिवशी यु. ता. भोकर, किरण दारासिंग कदम वय २१ वर्ष, रा.दिवशी बु. ता. भोकर असे असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांना त्यांचे ताब्यातील मिळून आलेल्या मोटारसायकल बाबत अधिक कौशल्याने विश्वासात घेवून विचारणा केली असता त्यांचे ताब्यातील मोटारसायकल ही पो.स्टे. भोकर येथील गुरन. ०१/२०२६ मधील चोरीची असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर मोटारसायकल दोन पंचांसमक्ष जप्त करुन त्यांना ताब्यात घेवून पोलीस स्टेशन भोकर येथे आणून त्यांना सदर गुन्ह्यात अटक केली.

या घटनेतील आरोपींना न्यायालयाकडून गुन्ह्याचे तपासकामी पोलीस कोठडी प्राप्त करुन त्यादरम्यान त्यांना अधिक विश्वासात घेवून तपास केला असता आरोपी नवीन नारायण गुदेवार याने निजामाबाद, बासर, नवीपेठ, डिचपल्ली, कामारेडी, येथून मोटारसायकली चोरी केलेल्या असल्याचे कबूल करुन काही मोटार-सायकली हे विक्री केले असल्याचे सांगितल्याने सदर मोटारसायकली संबंधितांकडून हस्तगत करून व इतर मोटारसायकलीया अटक आरोपीतां-कडून अशा एकूण ३४ मोटारसायकली २३ लाख ५ हजार रुपयाच्या जप्त करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये पोलीस स्टेशन भोकर व तेलंगाना राज्यातील पो.स्टे. निजामाबाद III टाऊन, पो.स्टे. डिचपल्ली, पोलीस स्टेशन कामारेडी, पो.स्टे. वासर, पो.स्टे. नवीपेठ येथील एकूण १३ मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणले असून उर्वरित २१ मोटारसायकलचे चेचीस क्रमांक व इंजिन क्रमांकावरुन गुन्हे पडताळणीचे काम सुरु आहे.

सदर गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक दिलीप जाधव करीत आहेत.

# प्रभाग ९ मधील शिवसेनेच्या सर्व उमेदवारांना विजयी करा –आमदार बालाजी कल्याणकर

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड उत्तर भागात झालेली आतापर्यंतची विकास कामे केवळ विकास कामाचे छोटे ट्रेलर आहे. विकास कामाचा खरा पिक्चर बघण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत शिवसेनेची सत्ता स्थापन करण्यासाठी शिवसेनेच्या प्रभाग क्र. ९ मधील सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन आमदार बालाजी कल्याणकर यांनी केले.



नांदेड वाघाळा शहर महानगर-पालिकेच्या प्रभाग क्रमांक ९ मध्ये शिवसेना उमेदवारांच्या प्रचारासाठी आमदार बालाजी कल्याणकर यांच्या नेतृत्त्वात काढण्यात आलेल्या रॅलीत हजारो मतदार, नागरिक आणि शिवसैनिक सहभागी झाले होते. तुम्ही फक्त शिवसेनेचे नगरसेवक विजयी करा, नांदेड उत्तर भागातील सर्वच प्रभागांचा सर्वांगीण विकास करण्याची जबाबदारी माझी राहील, असा विश्वास आ. बालाजी कल्याणकर यांनी यावेळी मतदारांना दिला.

प्रभाग क्रमांक ९ मधील शिवसेनेचे उमेदवार गायकवाड काशीबाई तुळशीराम, मादनवाड संतोष सायना, भालेराव नंदाबाई नवनाथराव आणि भोसले विलास यांच्या प्रचारासाठी आ. बालाजी कल्याणकर यांनी श्रीनगरसह या प्रभागातील सर्वच वार्डातून काढलेल्या रॅलीमुळे वातावरण शिवसेनामय झाले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली नांदेड उत्तर भागात करण्यात आलेली विकास कामे ही केवळ अडीच वर्षातील विकास कामांचे ट्रेलर आहे. आगामी काळात विकासाचा खरा पिक्चर तुम्हाला बघायला मिळेल. त्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत शिवसेनेची सत्ता स्थापन करण्यासाठी शिवसेनेच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन आ. बालाजी कल्याणकर यांनी यावेळी केले. शिवसेना जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे यांच्यासह शिवसेनेतील अनेक पदाधिकारी, शिवसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

मतदारांचा आशीर्वाद घेतले. नांदेड महानगरपालिकेत गेले तीस वर्षाहून अधिक काळ ज्यांनी सत्ता भोगली त्यांनी आता जनतेला वाऱ्यावर सोडले आहेत. नांदेडला चार वेळा मुख्यमंत्रीपदी मिळाले, परंतु नांदेडचा विकास होऊ शकला नाही. मुख्यमंत्री म्हणून भाई एकनाथराव शिंदे आणि नांदेडच्या विकासासाठी दिलेला निधी ऐतिहासिक ठरला आहे. त्यामुळे आम्ही केलेल्या कामाचा आणि दिलेल्या निधीचा लेखाजोखा जनतेसमोर प्रभागा प्रभागात फ्लेक्स लावून दिला आहे. आपण ते फ्लेक्स बघावेत आणि विकास कामे झाल्याचेही बघावे मगच शिवसेनेला मत द्यावे, असेही आ. कल्याणकर यांनी म्हटले.



**नांदेड** – नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांची जाहीर सभा छत्रपती शिवाजी महाराज स्मारक चौफाळा येथे पार पडली. यावेळी उपस्थित आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर, माजी आ. अविनाश घाटे, माजी आ. सुभाष साबणे, माजी आ. मोहनराव हंबर्डे, महानगराध्यक्ष माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटराव गोजेगावकर, वसंत सुगावे, जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, बाळासाहेब रावणगावकर, महानगर कार्याध्यक्ष माजी उपमहापौर सरजितसिंग गिल, कार्याध्यक्ष माधव पावडे, तालुकाध्यक्ष दीपक पावडे आदींसह प्रभागातील उमेदवार उपस्थित होते. (छाया : करणसिंह बैस, नांदेड)

# नांदेड शहराच्या विकासासाठी महापालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकवा –आमदार बोंढारकर

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड दक्षिण भागातील प्रत्येक प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी शिवसेना कटिबद्ध आहे. आगामी काळात या भागाचा संपूर्ण कायापालट करण्यासाठी आणि नागरी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकवा. यासाठी प्रत्येक प्रभागातील शिवसेनेच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन आमदार आनंदराव बोंढारकर यांनी केले आहे. महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १७ मधील शिवसेनेच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ रविवारी त्यांनी मतदारांच्या दारोदार जाऊन प्रचार केला. यावेळी ते बोलत होते.

नांदेड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ गुरुद्वारा प्रभाग क्रमांक १७ शिवसेना पक्षाचे अधिकृत उमेदवार रवींद्रसिंघ आशासिंघ बुंगई, बिरबल बिरजू यादव, हरमिंदर कौर रणजितसिंघ गिल (कोमल कामठेकर), ज्योती महेंद्र खेडकर यांनी प्रचारार्थ आ. आनंद पाटील बोंढारकर यांनी प्रभागात फिरून जनतेशी संवाद साधला. त्यावेळी प्रभागातील नागरिक व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना आ. आनंदराव बोंढारकर म्हणाले की, राज्यात लाडकी बहीण योजना लागू करण्याचे महान कार्य मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. महिलांना एसटी प्रवासात ५० टक्केची सवलत ही त्यांनीच दिली आहे. सर्व-सामान्यांच्या मुलींनाही शिक्षण घेता आले पाहिजे यासाठी उच्च शिक्षण मोफत करण्याचे कामही मुख्यमंत्री म्हणून एकनाथराव शिंदे यांनी केले. नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघावर शिवसेनेची सत्ता होती आणि आहे म्हणून त्या भागाचा विकास झाला. आता नांदेड दक्षिणचा विकास करण्यासाठी तुम्ही मला आशीर्वाद दिलात. परंतु महानगरपालिकेत शिवसेनेची सत्ता आणा त्यानंतर नांदेड दक्षिण भागातील प्रत्येक प्रभागाचा




सर्वांगीण विकास करण्याची जबाबदारी ना. हेमंत पाटील यांनी स्वीकारली आहे. त्यामुळे नांदेड दक्षिण भागातील प्रत्येक प्रभागातील शिवसेनेच्या प्रत्येक उमेदवाराला प्रचंड मते द्या आणि पुन्हा एकदा शिवसेनेवर आपला विश्वास दाखवा असे कळकळीचे आवाहन आ. बोंढारकर यांनी अक्षरशः हात जोडून मतदारांना केले आहे.

# जिल्हास्तरीय ग्रामीण अंडर-१९ वर्षांखालील मॉन्टेक्स बॉल क्रिकेट स्पर्धेत युनिव्हर्सल इंग्लिश मीडियम स्कूलचे यश

**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्हास्तरीय ग्रामीण अंडर-१९ वर्षांखालील मॉन्टेक्स बॉल क्रिकेट दि. १० रोजी झालेल्या स्पर्धेत युनिव्हर्सल इंग्लिश मीडियम स्कूल, नांदेड यांनी उल्लेखनीय कामगिरी करत मोठे यश संपादन केले.

या स्पर्धेतील अंतिम सामन्यात युनिव्हर्सल इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुलींच्या संघाने इक्रा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलच्या संघावर ६ धावांनी विजय मिळवत विजेतेपद पटकावले. अंतिम सामना अत्यंत चुरशीचा झाला. युनिव्हर्सल स्कूलच्या मुलींनी संयमित फलंदाजी, अचूक गोलंदाजी आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षणाच्या जोरावर हा ऐतिहासिक विजय मिळवला. मुलींच्या संघातील शेख आयशा हिने १६ धावा, तर साराली खान हिने १२ धावा करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

विजयी मुलींच्या संघात पुढील खेळाडूंचा समावेश होता. आलिया नाज, शेख आयशा, कावेंजली अंबोरे, रुतुजा गोंडगे, गुर्सिमर कौर उप्पल, खदीजा, साराली खान, संस्कृति मंठाळे, वैष्णवी ठाकूर, शाउनी चांदेल, सुजाता पवार, गुलजार शेख व निझबा खामन. या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेच्या




मुख्याध्यापिका श्रीमती ज्योत कौर पहाडिया, क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक व सर्व शिक्षकवर्गाने संघाचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धांसाठी प्रोत्साहित केले. या यशामुळे युनिव्हर्सल इंग्लिश मीडियम स्कूल, नांदेडचा क्रीडा क्षेत्रातील नावलौकिक अधिक वाढला आहे.

# सांगवी प्रभाग 'मिशन सर्वोत्तम' करणार –सौ. मीनल पाटील

**नांदेड (प्रतिनिधी)** –सांगवी प्रभाग हा अनेक वर्षापासून विकासापासून कोसोदूर आहे. या प्रभागाला विकासाच्या वाटेवर घेऊन जाण्यासाठी या भागाचा विकास करण्यासाठी आपण 'मिशन सर्वोत्तम' सांगवी प्रभाग या अंतर्गत सांगवी प्रभागाचा कायापालट करणार आहोत, अशी ग्वाही अपक्ष उमेदवार सौ. मिनल गजानन पाटील यांनी कॉर्नर बैठकीमध्ये दिली आहे.

सांगवी प्रभागाचा विकास करण्यासाठी त्यांनी मिशन अभियान सुरू केले आहे. या अंतर्गत अपक्ष उमेदवार सौ. मीनल गजानन पाटील यांच्यासह त्यांचे सर्व सहकारी हे प्रभागातील प्रत्येकाच्या घरी प्रत्यक्ष भेटी देऊन नागरिकांच्या समस्या लेखी स्वरूपात जाणून घेतल्या. यात प्रभागातील प्रमुख समस्यांबाबत लोकांचे मत जाणून घेतले.



रोजगारासह सांगवी प्रभागातील नागरिकांसमोर अनेक प्रश्नावली आहे. या सर्व प्रश्नांची उकल आपण स्वतः करणार आहे, त्यामुळे जनतेने भरभरून आशीर्वाद द्यावे, असे आवाहन त्यांनी बैठकीमध्ये बोलताना केले. त्यांनी गेल्या सहा महिन्यांपासून २९ कॉलनीसह सांगवी प्रभाग पिंजून काढला आहे. यावेळी मतदारांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. या प्रभागातील जनतेला विकास हवा आहे. त्यासाठी या प्रभागातील जनतेने भरभरून आशीर्वाद द्यावेत, असे आवाहन त्यांनी येथील कॉर्नर बैठकीमध्ये केले आहे. गेल्या सहा महिन्यापासून सहावी प्रभागातील नागरिकांच्या संपर्कात असल्यामुळे जनता त्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

## जिजाबाई जोंधळे यांचे निधन

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरातील श्रावस्तीनगरमधील ज्येष्ठ महिला श्रीमती जिजाबाई विठ्ठलराव जोंधळे (वय ८५ वर्षे) यांचे गुरुवार, दि. ८ जानेवारी रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. जिजाबाई जोंधळे यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दि. ९ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता गोवर्धन घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. जिजाबाई जोंधळे यांच्या पश्चात पाच विवाहित मुली, जावई, नातू, पणतू असा परिवार आहे.



# मथुरा वृंदावन येथे झालेल्या १५ व्या कृष्ण रंग महोत्सवात नांदेडच्या 'नृत्यांगन व नृत्यालय' संस्थेचे घवघवीत यश




**नांदेड (प्रतिनिधी)** –मथुरा वृंदावन येथे नुकत्याच पार पडलेल्या १५ व्या कृष्ण रंग महोत्सव - आंतरराष्ट्रीय नृत्य व संगीत स्पर्धा व महोत्सव २०२६ मध्ये पार पडला. या महोत्सवात नांदेड (महाराष्ट्र) येथील नृत्यांगन व नृत्यालय स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत अनेक प्रथम व द्वितीय पारितोषिके पटकावली.

या स्पर्धेत आरोही रविंद्र हंबर्डे हिने महाराष्ट्रीयन नृत्य प्रकारात प्रथम पारितोषिक, वाघ्यामुरळी समूह नृत्याने ओपन कॅटेगरीत प्रथम पारितोषिक, अदित्री तिवारी (ज्युनिअर महाराष्ट्रीयन लोकनृत्य) प्रथम पारितोषिक, स्वरा मंगळकर (ज्युनिअर सेमी-क्लासिकल) द्वितीय पारितोषिक, अनायझा ललानी (ज्युनिअर मॉडर्न) प्रथम पारितोषिक, स्वरा आलमखाने व स्ननाया आलमखाने (ज्युनिअर ड्युएट) प्रथम पारितोषिक, स्वरा आलमखाने (सिनिअर मॉडर्न) द्वितीय पारितोषिक, निधी संघई (सिनिअर सेमी-क्लासिकल) प्रथम पारितोषिक तसेच ईशा राजीव जैन, निधी संघई व स्वरा मंगळकर यांच्या सेमी-क्लासिकल ओपन कॅटेगरी त्रयी नृत्याने प्रथम पारितोषिक पटकावले.

या महोत्सवात संस्थेच्या संचालिका कु.ईशा राजीव जैन यांना 'ब्रीज मयुरी अवॉर्ड २०२६, तर संस्थेचे संचालक शुभम लालमन बिरकुरे यांना 'ब्रीज नृत्य शिरोमणी अवॉर्ड २०२६ या प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

या उल्लेखनीय यशामुळे नांदेड शहरासह महाराष्ट्राच्या कला क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल पालक, कला रसिक व विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## सदाशिव बोईवाड यांचे निधन

**बाऱ्हाळी (प्रतिनिधी)** – बाऱ्हाळी येथून जवळच असलेल्या मौजे कोळनूर येथील ज्येष्ठ नागरिक सदाशिव माणिका बोईनवाड (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने रविवार, दि. ११ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी १ वाजता मौजे कोळनूर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, दोन मुले, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संतोष बोईनवाड व विजय बोईनवाड यांचे ते वडील होत.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com